
'फ्लड डायव्हर्शन'चा पहिला टप्पा लवकरच (पान ५ वर)

दैनिक

# दिव्य वतन

जनसामान्यांचा बुलंद आवाज

नागपूर, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, वर्धा, यवतमाळ, अकोला, वाशीम, बुलडाणा, नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर, धाराशिव, अहिल्यानगर, छ. संभाजीनगर, बीड, जालना, नंदुरबार, धुळे, नाशिक


वैभव सूर्यवंशीच्या नेतृत्वाखाली भारताचा दमदार विजय (पान ७ वर)

RNI Number MAHBIL/२५/A०७८१ E-mail : divyawatan@gmail.com रविवार दिनांक ४ जानेवारी २०२६ अंक : १५१ वा वर्ष : २ रे, मूल्य : ३ रुपये, पृष्ठे : ८



# कार्यसम्राट नाही, करप्शन सम्राट!

## मुंबईतल्या पहिल्या प्रचारसभेत शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर घणाघात

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई-मुंबई:"कोणी माईचा लाल आला तरी कुणाच्याही सात पिढ्या खाली आल्या तरी मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी होऊ शकत नाही. आता भावनेचं राजकारण संपलंय, मुंबईकरांना विकासाचे मारेकरी नको तर विकासाचे वारकरी हवेत," अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर शेलक्या भाषेत टीकास्त्र सोडले. मुंबईतील आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिंदेंनी ठाकरेंच्या 'करून दाखवलं' या घोषणेचा समाचार घेत त्यांना 'करप्शन सम्राट' म्हणत त्यांच्यावर हल्लाबोल केला आहे. ते आज वरळीतल्या महायुतीच्या पहिल्या प्रचारसभेत बोलत होते.

'भावनेवर तुम्हाला आता निवडणुका जिंकता येणार नाही. तुम्हाला लोकांना विकास करून दाखवावा लागेल. मुंबईकरांना विकासाचे मारेकरी नकोत, मुंबईकरांना विकासाचे वारकरी पाहिजेत, आता बदलली आहे परिस्थिती. मुंबईकर जनता सुज्ञ आहे. दिवसभर नेटफक्स आणि निवडणुका आल्या की पॉलिटिक्स तो गेला जमाना आता. ज्यांनी मुंबईची वाट लावली अशा लोकांच्या हातात मुंबई देणार? कधीच मिळणार नाही. एवढे वर्ष मुंबईत यांची सत्ता होती, तरी सुद्धा मराठी माणूस वसई- विरार नाला सोपारा इकडे अंबरनाथ बदलापूरकडे का फेकला गेला? याच उत्तर द्या.' असं शिंदे म्हणाले. 'मराठी माणूस मुंबईतून हद्दपार का झाला? कुणामुळे मुळे





झाला? याला जबाबदार कोण? याचं उत्तर द्या. मुंबईच्या मेट्रो प्रकल्पात खो कोणी घातला? याचं उत्तर द्या. मुंबईची लाईफलाईन असलेल्या बेस्टच वाटोळ कोणी केलं? कोविड रुग्णांच्या तोंडातली खिचडी कोणी खाल्ली? बॉडी बॅग मध्ये पैसे बनवण्याच पाप कोणी केलं? गरीब मुंबईकरांच्या घराच स्वप्न धुळीला कोणी मिळवलं? मुंबईत मोक्याचे भूखंड धनदांडग्यांच्या घशात कोणी घातले? गिरणी कामगारांच्या तोंडाला पानं कोणी पुसली? बीडीडी चाळीतल्या रहिवाशांचे हाल कोणी केले? पत्रा चाळीतल्या लोकांना देशोधडीला कोणी लावलं?', अशा अनेक प्रश्नांची सरबत्ती करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर एकच हल्लाबोल केला आहे. यावेळी पुढे ते म्हणाले की, नंतर आपण (महायुती) घर बीडीडी चाळीतल्या लोकांना घर दिली.

यावेळी शिंदेंनी ठाकरेंच्या करुन दाखवलं या जाहिरातीतील घोषणेवर म्हणाले की, 'यांनी कचऱ्यात करप्शन करून दाखवलं, गटारात करप्शन करून दाखवलं, डांबरात करप्शन करून दाखवलं, खिचडीत करप्शन करून दाखवलं, मिठी नदीच्या गाळात करप्शन करून दाखवलं. आम्ही करून दाखवलं म्हणतात हे कार्यसम्राट आहेत? मी म्हणेन हे करप्शन सम्राट आहेत. किती खाणार? आणि त्यांची भूमिका करप्शन फर्स्ट आणि आमचं महायुतीच मुंबई फर्स्ट. हा फरक आहे. आमच मिशन महाराष्ट्र फास्ट आणि मुंबई सुपरफास्ट हे आमचं मिशन आहे. खूप वर्ष मुंबई लुटून खाल्ली तुम्ही. आता तुमची बनवाबनवी चालणार नाही. तुमच्या झाशामध्ये मुंबईकर येणार नाही. आता फसणार नाही.'

'मराठी माणसाबद्दल बोलता, महापालिकेचे कंत्राट देताना कधीतरी मराठी माणूस दिसला का तुम्हाला? मराठी कंत्राटदारांना ब्लॅकलिस्ट करण्याच पाप कोणी केलं?जिथे टेंडर तिथे सरेंडर ही भूमिका तुमची कायम राहिली आहे. त्यांच्या किचन कॅबिनेट मधला चंपकलाल कोण आहे? पत्रकारांनी जरा शोधपत्रकारीता करावी. रमाबाई आंबेडकरांचा 17 वर्ष प्रकल्प रखडला होता. आपण तुम्ही आम्ही मिळून तो प्रकल्प पुढे नेतोय.

## महत्त्वाचे...

### मनाच्या एकाग्रतेने कृष्ण नामसंकीर्तन केल्यास निश्चितच श्रीकृष्ण भेटतात!



शेगाव :'संपूर्ण जीवन कृष्णाच्या भक्तीत रमून कृष्णाचे नाम कीर्तन केल्यास भगवान प्राप्ती होते. एकाग्रतेने कृष्ण नाम संकीर्तन केले तर निश्चितच श्रीकृष्ण भेटतात. व वेळ कसा निघून जातो कळतही नाही, भागवत कथा श्रवण करूनही आपण आपले मन शुद्ध करू शकतो,' असे विचार उत्तर प्रदेशातील वृंदावन धाम येथील परमहंस आश्रमाचे आचार्य संजीव कपील महाराज यांनी मांडले.

श्री हरिभक्त सेवा समितीच्या वतीने आचार्य संजीव कपील महाराजांची संगीतमय श्रीमद् भागवत कथेचे (हिंदी) आयोजन गुरुवार २५ ते बुधवार ३१ डिसेंबरपर्यंत दुपारी १ ते ५ या वेळेत श्रीराम नगर नवीन लेआऊट खामगाव रोड शेगाव येथे करण्यात आले होते. संगीतमय हिंदी श्रीमद् भागवत कथेची सांगता गुरुवारी १ जानेवारी रोजी व हरि नाम कीर्तनात झाली. या संगीतमय हिंदी श्रीमद् भागवत कथा ज्ञान यज्ञाचा भाविकांनी कथा श्रावणाचा लाभ घेतला. कथेच्या शेवटच्या दिवशी महाराजांनी संकीर्तन करीत 'श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारी हे नाथ नारायण वासुदेवाय' हे भजन गायले.भागवत कथेला गुरुवारी २५ डिसेंबर रोजी प्रारंभ झाला.

### बिबट्याच्या बछड्याची आईशी कळमेश्वर- दुधा शिवारात भेट



कळमेश्वर - दुधा शिवारात एका गोठ्यात बिबट्याचा बछडा आढळल्याने दोन दिवसांपासून परिसरात खळबळ उडाली होती. वन विभागाच्या तत्परतेमुळे बिबट्याच्या बछड्याची आईशी शुक्रवारी २ जानेवारीला पुन्हा भेट झाली. कळमेश्वर शिवारात बुधवारी ३१ डिसेंबरला शेतकऱ्यांना एका गोठ्यात काही हालचाल जाणवली होती. त्यांनी पाहणी केली असता गोठ्यात बिबट्याचा बछडा दिसला होता. याबाबत माहिती मिळताच वन विभागाच्या अधिकारी - कर्मचाऱ्यांनी दाखल होऊन बछड्याला सुरक्षितपणे ताब्यात घेतले. त्याला सुरक्षित स्थळी ठेवून त्याची काळजी घेतली. बछड्याची आई पुन्हा त्या ठिकाणी येईल या शक्यतेने वन विभागाकडून परिसरात ट्रॅप कॅमेरे बसवले. या माध्यमातून दोन दिवसांपासून निरीक्षण सुरू होते. अखेर गुरुवारी १ जानेवारीला रात्री ७ वाजून १२ मिनिटांनी बिबट्याची मादी बछड्या जवळ आल्याचे ट्रॅप कॅमेऱ्यात चित्रीत झाले. काही वेळ परिस्थितीचा अंदाज घेत तिने बछड्याला तोंडात उचलले आणि शेतातून जंगलाच्या दिशेने निघून गेली. यामुळे अखेर आई - बछड्याचे पुनर्मिलन झाल्याची खात्री झाली असून, भीतीचे वातावरणही निवळले. वन विभागाने तत्परता, संवेदनशीलतेने राबवलेल्या या मोहिमेमुळे ग्रामस्थ आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. वन विभागाने शेतकऱ्यांना खबरदारीचा इशारा दिला. रात्री शेतात जाताना काठी सोबत ठेवावी, एकट्याने जाणे टाळावे स्वतःची काळजी घेत परिसरात वावरावे, असे आवाहन वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी केले आहे.'तो' बिबट्या मात्र वेगळा कळमेश्वर - दुधा परिसरातील बिबट्याच्या बछड्याची व आईची पुन्हा भेट झाली असतानाच कासारखेडला कालवडीवर हल्ला करणारा बिबट्या वेगळा असल्याचे समोर आले आहे. गुरुवारी १ जानेवारीच्या रात्री ७ वाजून १८ मिनिटांनी त्या परिसरात लावलेल्या कॅमेऱ्यात बिबट्या दिसला. यामुळे दोन्ही बिबटे हे वेगळे असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## जामगव्हाण तांडा शिवारात जुगार अड्ड्यावर छापा

### 3 दुचाकी, 4 मोबाईलसह 3.05 लाखांचा मुद्देमाल जप्त

दिव्य वतन /वृत्तसेवा

हिंगोली - आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यांतर्गत जामगव्हाण तांडा शिवारात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने झन्नामन्ना जुगार अड्ड्यावर छापा टाकून ३ दुचाकी, ४ मोबाईलसह ३.०५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात सात जणांवर शुक्रवारी ता. २ रात्री गुन्हा दाखल झाला आहे.हिंगोलीचे पोलिस अधीक्षक निलभ रोहन यांनी जिल्हाभरात अवैध व्यवसायावर छापे टाकण्यासाठी विशेष पथक स्थापन केले आहे. स्थानिक पोलिस ठाण्याच्या



पथकासह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक देखील कार्यरत ठेवण्यात आले आहे.

अवैध व्यवसाय करणाऱ्यांची माहिती घेऊन छापे टाकण्याची मोहिम हाती घेण्यात आली आहे.त्यानुसार गुन्हे शाखेचे निरीक्षक मोहन भोसले, पोलिस निरीक्षक विष्णूकांत गुठ्ठे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक शिवसांब घेवारे, जमादार भुजंग कोकरे, गजानन पोकळे, हरिभाऊ गुंजकर, साईनाथ कंठे, नरेंद्र साळवे, ज्ञानेश्वर गोरे, आकाश टापरे, विठ्ठल जाधव यांच्या पथकाने आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यांतर्गत जामगव्हाणतांडा शिवारात जुगार अड्ड्यावर छापा टाकला.

## प्रसुतीसाठी जंगलातून पायपीट; प्रथम बाळ अन् नंतर मातेचा मृत्यू

दिव्य वतन /वृत्तसंस्था

गडचिरोली- विकसित भारत आणि प्रगत महाराष्ट्राच्या गप्पा मारल्या जात असताना, गडचिरोलीतील एटापल्ली तालुक्यात राज्याच्या आरोग्य व्यवस्थेचे धिंडवडे काढणारी एक हृदयद्रावक घटना घडली आहे. या ठिकाणी एका मातेला प्रसूतीसाठी रस्ते आणि डॉक्टरांच्या अभावी आपला प्राण गमवावा लागला आहे. आशा संतोष किरंगा (वय २४) या गर्भवती मातेने आपल्या पोटातील बाळाला वाचवण्यासाठी पतीसोबत ६ किलोमीटरची जंगलमय पायपीट केली, परंतु वेळेत उपचार न मिळाल्याने आधी बाळाचा पोटातच मृत्यू झाला आणि त्यानंतर काही वेळातच मातेनेही अखेरचा श्वास घेतला.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, एटापल्ली तालुक्यातील आलदंडी टोला गावात राहणाऱ्या आशा किरंगा नऊ महिन्यांच्या गर्भवती होत्या. गावात कोणतीही प्रसूती सुविधा उपलब्ध नव्हती. ऐनवेळी प्रसववेदना सुरू झाल्या तर दवाखान्यात कसे पोहोचायचे, या भीतीने त्यांनी १ जानेवारी रोजी आपल्या पतीसोबत ६ किलोमीटर अंतरावर असलेल्या पेठा (बहिणीचे गाव) येथे जाण्याचा निर्णय घेतला. हे अंतर त्यांनी घनदाट जंगलातून पायी पार केले.

२ जानेवारीच्या मध्यरात्री



आशा यांना तीव्र प्रसववेदना सुरू झाल्या. आशासेविकेच्या मदतीने त्यांना तातडीने हेडरी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. मात्र, तिथे तपासणी केली असता बाळ पोटातच दगावल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या धक्क्याने आणि वाढत्या रक्तदाबाने आशा यांची प्रकृती वेगाने खालावली आणि उपचारादरम्यान त्यांचाही मृत्यू झाला.धक्कादायक बाब म्हणजे, मृत्यूनंतरही या मातेच्या नशिबी असलेली वणवण थांबली नाही. शवविच्छेदनासाठी बाळ आणि मातेचे शव हेडरी येथून मृतदेह एटापल्ली ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला, परंतु तिथे स्त्रीरोग तज्ज्ञ उपलब्ध नव्हते. त्यानंतर दोघांचे मृतदेह पुन्हा ४० किलोमीटर लांब असलेल्या अहेरी उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. काल शुक्रवारी दुपारी शवविच्छेदन झाल्यानंतर मृतदेह नातेवाइकांना सुपूर्द करण्यात आला. मृत्यूनंतरही या मातेच्या वाट्याला आलेली वणवण पाहून नातेवाईकांनी संताप व्यक्त केला आहे.

## 70 हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचा आरोप तरीही मी सत्तेत

### पुण्यात अजित पवारांनी भाजपला करून दिली कटू सत्याची आठवण

दिव्य वतन /वृत्तसेवा

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. शुक्रवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत अजित पवारांनी सत्ताधारी भाजपवर भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप करत राजकीय वातावरण तापवले. माझ्यावर 70 हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप झाले होते, हे सर्वांना माहिती आहे. पण ज्या लोकांनी माझ्यावर हे आरोप केले, त्यांच्याच सोबत मी आज सरकारमध्ये बसलो आहे, हे वास्तव आहे, असा थेट सवाल करत अजित पवारांनी भाजप नेत्यांना अडचणीत आणले. त्यांच्या या विधानामुळे पिंपरी-



चिंचवडच्या निवडणूक प्रचारात नव्या वादाला तोंड फुटले आहे.

अजित पवार म्हणाले की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील सत्ताधाऱ्यांचे सध्या एकच लक्ष्य आहे. कुठे आणि कशातून भ्रष्टाचार करून पैसे कमावता येतील. आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महानगरपालिकांपैकी एक असलेली पिंपरी-चिंचवड पालिका कशी कर्जाच्या खाईत ढकलली गेली, हे जनतेने पाहिले आहे, असा आरोप त्यांनी केला. त्यांच्या मते, पालिकेच्या सुमारे 8 हजार कोटी रुपयांच्या ठेवी भाजपच्या सत्ताकाळात मोडण्यात आल्या. या ठेवी मोडून नेमकी कोणती विकासकामे झाली, याचा हिशोब जनतेसमोर मांडावा, अशी थेट मागणी त्यांनी केली.भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावर बोलताना अजित पवार अधिक आक्रमक झाले. पिंपरी-चिंचवडमध्ये भ्रष्टाचार इतका वाढला आहे की अवघ्या सव्वा किलोमीटर रस्त्यासाठी 81 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला, असा धक्कादायक दावा त्यांनी केला. आम्ही कधीही सत्तेचा उन्माद होऊ दिला नाही, पण सध्याच्या सत्ताधाऱ्यांना सत्तेची मस्ती, नशा आणि माज चढला आहे, अशा शब्दांत त्यांनी भाजपवर घणाघाती टीका केली. त्यांच्या या वक्तव्यामुळे रस्ते विकास आणि निधी वाटपावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.महानगरपालिका पूर्णपणे भ्रष्टाचाराने पोखरली असल्याचा आरोप करत अजित पवारांनी विविध प्रकल्पांचा उल्लेख केला. रस्ते, शिक्षण व्यवस्था, कुत्र्यांची नसबंदी यासारख्या मूलभूत सेवांमध्येही मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याचे त्यांनी सांगितले.

## 60-65 नगरसेवक बिनविरोध कसे निवडून येतात- संजय राऊत

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई-राज्यात सुरू असलेल्या महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर बिनविरोध निवडींवरून शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. काय म्हणून यांचं कर्तृत्व की त्यांना बिनविरोध निवडून दिलं जातंय? असा थेट सवाल करत राऊतांनी सत्ताधाऱ्यांवर संशयाची छाया टाकली आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात बिनविरोध निवडी होणं हे लोकशाहीसाठी धोकादायक असून, यामागे दबाव, भीती आणि गैरप्रकार असल्याचा आरोप त्यांनी केला.संजय राऊत म्हणाले, 60 ते 65 उमेदवार बिनविरोध कसे काय निवडून येतात? हे कोणत्या विकासकामांच्या, कोणत्या



लोकहिताच्या कर्तृत्वावर? असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी भाजपच्या सत्ताकाळातील कामगिरीवर प्रश्नचिन्ह निर्माण केलं. बिनविरोध निवडी ही लोकशाहीची हत्या असून, मतदारांचा हक्क हिरावून घेतला जात असल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. निवडणूक आयोगावरही राऊतांनी सडकून टीका केली. निवडणूक आयोग म्हणजे भ्रष्टाचाऱ्यांच्या ताटाखालचं मांजर झालं आहे, अशा तीव्र शब्दांत त्यांनी आयोगाच्या भूमिकेवर नाराजी व्यक्त केली. बिनविरोध निवडींची सखोल चौकशी झाली पाहिजे, अन्यथा लोकशाहीवरील विश्वास उडेल, असा इशाराही त्यांनी दिला.देशातील आणि जगातील लोकशाही इतिहासात इतक्या मोठ्या संख्येने उमेदवार बिनविरोध निवडून येण्याची उदाहरणे नसल्याचे सांगत राऊत यांनी याला लोकशाहीसाठी धोकादायक प्रवृत्ती ठरवले. अटल बिहारी वाजपेयी, बॅरिस्टर नाथ पै, वसंतदादा पाटील, राम मनोहर लोहिया किंवा आजचे पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील कधी बिनविरोध निवडून आले नाहीत. मग महाराष्ट्रात एवढे लोक कोणत्या कर्तृत्वावर बिनविरोध निवडून येत आहेत? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.



## 'बिनविरोध पॅटर्न' विरोधात मनसे कोर्टात जाणार; उभ्या आयुष्यात मी अशी निवडणूक पाहिली नाही, राज ठाकरेंनी व्यक्त केले आश्चर्य

दिव्य वतन /वृत्तसेवा

मुंबई- राज्यातील 29 महापालिकांसाठी 15 जानेवारीला मतदान होणार असले तरी, अनेक प्रभागांमध्ये आतापासूनच विजयाचा उत्सव सुरू झाला आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेनंतर राज्यातील 70 जागी विरोधी उमेदवारांची माघार किंवा एकच उमेदवार रिंगणात उरल्याने त्यांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे. यामध्ये महायुतीचे, विशेषतः भाजपचे पारडे जड असल्याचे दिसून येत आहे. या विचित्र राजकीय परिस्थितीवर मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी आश्चर्य व्यक्त करत, "उभ्या आयुष्यात मी अशी निवडणूक पाहिली नाही," असे विधान केले आहे.

ठाण्याचे शहराध्यक्ष अविनाश जाधव, अभिजीत पानसे आणि माजी आमदार राजू पाटील यांनी आज राज ठाकरे यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान, राज ठाकरेंनी महानगरपालिकेतील बिनविरोध विजयावरुन वक्तव्य केले. माझ्या उभ्या आयुष्यात अशी निवडणूक कधी मी पाहिली नाही. बाळासाहेब ठाकरेंसोबत अनेक निवडणुका पाहिल्या, पण अशी निवडणूक जी इतक्या उमेदवारांना बिनविरोध करते. ही परिस्थिती पहिल्यांदाच मी पाहतोय, असे राज ठाकरे म्हणाले.दरम्यान, या 'बिनविरोध पॅटर्न'विरोधात मनसे सोमवारी न्यायालयात धाव घेणार आहे. "उमेदवार कोट्यवधी रुपयांना विकत घेतले असून कोपरीतील आमच्या महिला उमेदवाराला ५ कोटींची ऑफर देण्यात आली," असा खळबळजनक आरोप मनसे नेते अविनाश जाधव यांनी पुराव्यांसह केला आहे. राज ठाकरेंची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी संवाद साधला."कोपरी भागातील मनसेच्या महिला उमेदवाराला पमनानी नावाच्या व्यक्तीने मध्यरात्री जवळपास ३० ते ४० वेळा फोन केले. त्यांना मुलुंड येथे जबरदस्ती भेटायला बोलावलं होतं. उमेदवारी मागे घेण्याकरता त्यांना पाच कोटीची ऑफरही देऊ केले. हवं तर तिथलं सीसीटीव्ही फुटेज चेक करा", असंही अविनाश जाधव म्हणाले.

"राज्यात बिनविरोध पॅटर्न तयार झाला आहे. हा पॅटर्न आता मोडला नाही तर निवडणुकीच्या सहा महिने आधी माणसं दुसऱ्या पक्षात पाठवतील आणि निवडणुकाच होऊ देणार नाहीत. याची चौकशी झाली तर ६४ च्या ६४ ठिकाणी पुन्हा निवडणुका घ्याव्या लागतील. निवडणुकीचा अधिकार प्रत्येकाला आहे. निवडणुकाच होणार नसतील तर मतदान करण्याचा अधिकार मिळणार नाही", असेही अविनाश जाधव म्हणाले.बिनविरोध निवडून येणाऱ्या उमेदवारांमध्ये भारतीय जनता पक्षाने मोठी आघाडी घेतली असून, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेनेही जोरदार मुसंडी मारली आहे. आतापर्यंत भाजपचे 44 नगरसेवक बिनविरोधी निवडून आले आहेत. त्यापाठोपाठ शिवसेना शिंदे गटाच्या 22 उमेदवारांनी बिनविरोध विजय मिळवला आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे 2, इस्लाम पार्टीचा 1 (मालेगाव) आणि अपक्ष 1 असे एकूण 70 नगरसेवक महानगरपालिका निवडणुकीत बिनविरोध निवडून आले आहेत.

# 12 वर्षांच्या मुलाला पालक बेड्यांमध्ये ठेवत होते चोरी करण्याची सवय होती; 3 महिन्यांपासून अत्याचार...

दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी

नागपूर नागपूरमध्ये एका 12 वर्षांच्या मुलाला त्याच्याच आई-वडिलांनी घरात लोखंडी साखळदंडांनी बांधून ठेवले होते. मुलगा चोरी करत असल्याचा आरोप आहे, त्यामुळे ते कामावर जाण्यापूर्वी रोज सकाळी 9 वाजता त्याला बांधून ठेवत असत. माहिती मिळाल्यावर पोलिस आणि महिला व बाल विकास विभागाचे पथक घटनास्थळी पोहोचले आणि मुलाची सुटका करून सरकारी बालगृहात पाठवले आहे.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, पथक जेव्हा घरी पोहोचले तेव्हा मुलगा एका कोपऱ्यात बादलीवर उभा असलेला आढळला. त्याचे हात-पाय साखळदंडांनी बांधलेले होते. मुलाच्या शरीरावर जुन्या जखमा आणि मारहाणीच्या खुणा आढळल्या. मुलासोबत गेल्या 2-3 महिन्यांपासून असे गैरवर्तन केले जात होते. शिक्षणही सोडवले, मुलगा घरातच कैद राहिला

पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार आई-वडील मुलावर मोबाईल आणि छोट्या-मोठ्या वस्तू चोरल्याचा आरोप करत होते. याच कारणामुळे ते त्याला नियंत्रणात ठेवण्यासाठी बेड्यांनी बांधत होते. मुलाला अनेक तास याच अवस्थेत ठेवले जात होते.

मुलाचे शिक्षण सोडवले होते आणि तो शाळेतही जात नव्हता. त्याला बाहेर पडण्याची किंवा इतर मुलांशी भेटण्याची परवानगीही दिली जात नव्हती.

मुलाला वैद्यकीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. डॉक्टरांच्या मते, मुल शारीरिकदृष्ट्या कमकुवत आहे आणि मानसिक तणावातही आहे. त्याला समुपदेशन दिले जात आहे आणि त्याची प्रकृती स्थिर आहे.

पोलिसांनी याप्रकरणी पालकांविरुद्ध बाल न्याय (मुलांची काळजी आणि संरक्षण) कायद्यांतर्गत तक्रार दाखल करून कारवाई सुरू केली आहे.





## महत्त्वाचे...

### मौदा येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

मौदा - मौदा येथील स्थानीय जनता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय मौदा येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना त्यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून उप मुख्याध्यापक श्री नामदेव तांबडे प्रमुख पाहुणे म्हणून सौ.भारती परसतवार श्री सचिन मोरया उपस्थित होते. कार्यक्रमांमध्ये वर्ग पाच ते आठच्या अनेक विद्यार्थ्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर भाषणाच्या माध्यमातून प्रकाश टाकला. यावेळी अनेक विद्यार्थिनींनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारली होती अनेक विद्यार्थिनी यांनी गीताच्या माध्यमातून सावित्रीबाई चे कार्य सर्वांना सांगितले तसेच विद्यार्थ्यांनी नाटिकेच्या माध्यमातून सावित्रीबाईंच्या खडतर जीवनातील प्रवास प्रकट केला. सावित्रीबाईंनी अंगावर चिखल, सेण, माती,दगड झेलले त्यामुळेच आज मुलींना शिक्षणाचा प्रवाह मोकळा झाला, त्यांच्या या कर्तुत्वामुळेच आज अनेक विद्यार्थिनी विविध क्षेत्रात नाव कमावत आहे म्हणून सावित्री आईचे कार्य अतुलनीय आहे.

### जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा खंडाळा येथे सावित्रीबाई फुले जयंती साजरी

काटोल- आज दि. 03/01/2026 रोज शनिवार ला सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था डॉ बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण संस्था ( बार्टी ) पुणे तसेच समाज कल्याण नागपूर, यांच्यावतीने जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा खंडाळा ( खुर्द ) येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री जीवन भेलकर प्रमुख पाहुणे म्हणून श्री मोहन पांडे तालुका समतादूत काटोल हे होते यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. तर संचालन उदय ब्राम्हटकर वर्ग 5 वी यांनी केले तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कु. सविता दुहीजोड, सौ ज्योती वलके, काटोल तालुका समतादूत श्री मोहन पांडे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा धारण करून आलेल्या विद्यार्थिनी कु. नेहा भादा, कु. आराध्या उईके, कु. नंदिनी परतेती यांनी मार्गदर्शन केले. तसेच वर्ग 4 थीचे कु. योगीश्री आहाके, कु. प्रेरणा सहारे, वर्ग 3 रा च्या कु. आराध्या, कु. हिना उईके, कु. खुशबू उईके व कु. आचल परतेती या विद्यार्थिनी यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर माहिती सांगितली. तसेच कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री मोहन पांडे सर यांनी संविधान अमृत महोत्सव या उपक्रमाअंतर्गत संविधानातील मूलभूत कर्तव्य व सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. आभार प्रदर्शन वर्ग 6 वी चा सक्षम ढोके यांनी मानले. कार्यक्रमाला शाळेतील संपूर्ण विद्यार्थी व गावकरी उपस्थित होते. सामूहिक संविधान वाचन घेऊन कार्यक्रम संपन्न झाला.

### जैन कलार समाज भवनात राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धा रविवारी

नागपूर च्यावतीने राष्ट्रीय स्तरावरील अबॅकस स्पर्धेचे आयोजन जैन कलार समाज भवन नागपूर येथे 4 जानेवारीला रविवारी सकाळी १० वाजता आयोजन केले आहे. या महत्त्वपूर्ण व प्रेरणादायी शैक्षणिक उपक्रम विद्यार्थ्यांना व पालकांना आणि समाजाला निश्चित प्रेरणा मिळेल. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी एकाग्रता वाढीसाठी व गणितीय कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. या स्पर्धेत विविध शाळांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याची माहिती दिक्षा खानोरकर यांनी दिलेली आहे.

## सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक धोरण संविधानाच्या पानावर आले म्हणून फुले दांपत्याचा कार्यांचे सोनं झाले

दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी

नागपूर : शिक्षणाची दारे तर बंद होतीच अ ब क शब्द हि कानात पडले तर कानात गरम तेल होते कलम नाही कागद नाही जमिनीची पढा काडीची लेखनी शिक्षणाच्या विचारही केला तर शेन मातीच्या वर्षाव असा कशा परिस्थितीतून शिक्षणाची वाट तुडवत फुले दांपत्यानी साहस करून कोट्यवधी रंजल्या गांजलेल्या रयतेच्या डोक्यात शिक्षणाचे बीजारोपण करून सन्मानाच्या धडा शिकवला हे मोलाचं कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या पानावर उतरवले नसते तर शैक्षणिक चळवळीचे काय झाले असते असे मार्मिक भाष्य कवी तन्हा नागपुरी यांनी केले ते आज आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाच्या वतीने सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात अध्यक्षास्थानावरू बोलत होते प्रथम रोशन बारमासे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले तर जयदेव चिंवडे यांनी दिपप्रज्वलन केले ओबीसी नेते राजू दादा पांजरे. देवेंद्र बागडे यांनी महात्मा फुले सावित्रीबाई फुले यांच्या जिवन चत्रिरावर प्रकाश टाकला. धर्माजी बागडे यांनी सावित्रीबाई फुले अमर रहे या घोषवाक्याने संपूर्ण परिसर दणाणून सोडले. यावेळी संचालन प्रा.रमेश दुपारे यांनी तर आभार हंसराज उरकुडे यांनी मानले. याप्रसंगी आंरिमोचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## रोशन मेश्राम यांची राजीव गांधी पंचायती राज संगठनच्या महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी नियुक्ती

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

मौदा :- अखिल भारतीय काँग्रेस समितीने राजीव गांधी पंचायती राज संगठन, महाराष्ट्र राज्याची प्रदेश कार्यकारणी तसेच जिल्हाध्यक्षांची कार्यकारणी जाहीर केली असून, या नव्याने घोषित करण्यात आलेल्या प्रदेश कार्यकारणीत नागपूर जिल्ह्यातील मौदा तालुक्यातील ग्रामपंचायत नेरला येथील उपसरपंच तथा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रोशन मेश्राम यांची महाराष्ट्र प्रदेश सचिव पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

रोशन मेश्राम हे गेल्या सुमारे १५ वर्षांपासून काँग्रेस पक्षाच्या विचारधारेवर निष्ठेने काम करीत असून, संघटन मजबूत करण्यासाठी तसेच ग्रामीण, शेतकरी, युवक, वंचित व सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष करत आहेत. सध्या ते महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव म्हणूनही जबाबदारी पार पाडत असून, त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याची दखल घेऊनच त्यांची ही महत्त्वाची नियुक्ती करण्यात आल्याचे मानले जात आहे.

ग्रामपंचायत स्तरापासून ते तालुका व जिल्हा स्तरापर्यंत पंचायती राज व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी, स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम करण्यासाठी आणि लोकशाही मूल्ये तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी रोशन मेश्राम यांनी केलेले कार्य प्रेरणादायी ठरले आहे. त्यांची ही निवड म्हणजे ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांच्या




सातत्यपूर्ण मेहनतीचा सन्मान असल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे.या नियुक्तीबद्दल रोशन मेश्राम यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, राजीव गांधी पंचायती राज संगठनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. सुनील पवार, राज्यसभा खासदार मुकुल वासनिक, माजी मंत्री सुनील केदार, माजी मंत्री राजेंद्र मूळक, रामटेक लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्यामकुमार बर्वे तसेच राजीव गांधी पंचायती राज संगठनचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संजय ठाकरे यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत.

आपल्यावर सोपविण्यात आलेल्या या जबाबदारीला पूर्ण न्याय देत, पंचायती राज संस्थांचे सक्षमीकरण, काँग्रेस पक्षाची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवणे आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी अधिक जोमाने काम करण्याचा संकल्प रोशन मेश्राम यांनी यावेळी व्यक्त केला.या नियुक्तीमुळे नेरला ग्रामपंचायत, मौदा तालुका व नागपूर जिल्ह्यासह संपूर्ण विदर्भात आनंदाचे वातावरण असून, अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी रोशन मेश्राम यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## महात्मा फुले शिक्षण संस्थेत क्रांतिज्योती सावित्रीआई फुले जयंती संपन्न

दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी

नागपूर :महात्मा फुले शिक्षण संस्था रेशीमबाग नागपूर येथे शनिवारी 3 जानेवारीला "क्रांतिज्योती सावित्रीआई फुले जयंती" साजरी करण्यात आली. सर्वप्रथम क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांच्या पुतळ्यांना संस्थेचे उपाध्यक्ष गुलाबराव चिचाटे व संचालिका शोभाताई लेकुरवाळे यांनी पुष्पहार अर्पण करून मानवंदना दिली.



याप्रसंगी स्वाती सोनुले यांनी "मी सावित्री बोलतेय" ही सुंदर लघुनाटिका प्रस्तुत केली.यावेळी संस्थेचे कार्याध्यक्ष प्रकाश देवते, सरचिटणीस रवींद्र अंबाडकर, सहचिटणीस रमेश राऊत, थोर महापुरुषांची जयंती स्मृतिदिन समारोह समितीचे संयोजक राजेंद्र पाटील सह- संयोजक प्रा. डॉ.अभिजित पोतले, संचालक देवेंद्र काटे प्रा.पंकज कुरळकर, संचालिका प्रा.अलका झाडे, माधुरी गणोरकर संस्थेचे आजीवन सभासद शंकरराव चौधरी, बळीराम राऊत, आनंदराव बानाईत, अरुण ढाकूलकर, उज्वला पाटील, सिंधू कांडलकर, नंदा सोनुले, सीमा गाडगे, हेमा घोळसे, माया जोगे व देवराव प्रधान सह मोठ्या संख्येने समाजबांधव व भगिनी उपस्थित होते.



## मुबलक पाण्यामुळे अंढेरा परिसरामधील शेतशिवार हिरवेगार

अकोला : प्रचंड पावसामुळे खरीप हंगामातील कपाशी, सोयाबीन या पिकांचे नुकसान झाले होते. त्यामुळे शेतकऱ्यांच्या डोक्यावरील कर्जाचा डोंगर आणखी वाढला आहे. दरम्यान, आता रब्बी हंगामात परिसरातील शेतशिवार बहरले असून, शेतकऱ्यांची या पिकावर मदार आहे. मागील वर्षी झालेल्या जोरदार पावसामुळे खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाले. दुसरीकडे मात्र या पावसामुळे विहिरी, तलाव तुडुंब भरले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये या रब्बी हंगामाबाबत समाधान आहे. मोठ्या प्रमाणावर पाणी उपलब्ध असल्याने याच भरवशावर अनेक शेतकऱ्यांनी रब्बीची पेरणी केली आहे. अनेक शेतकऱ्यांनी कपाशी काढून टाकून मका, हरभरा, गहू आणि भुईमूग या पिकांची लागवड केली आहे.

## परम पूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमी नागपूर यांच्या वतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

दिव्य वतन /तालुका प्रतिनिधी

नागपूर :क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवन त्याग धैर्य बलिदान आणि सामाजिक समस्येचा प्रसार प्रचारासाठी प्रेरणादायी कार्यक्रम आज शनिवार दिनांक ३ जानेवारीला सायंकाळी ४ वाजता दीक्षाभूमी परिसरातील सभागृहांमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या फोटोला पुष्पहार व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दीक्षाभूमीचे विलासभाऊ गजघाटे, प्रमुख अतिथी डॉ. प्रा. भिक्खू सम्यक बोधी भिक्खू विनय भिक्खू महातिस्स दिनेश वैरागडे डॉ. दिगंबर मेश्राम भिख्युनी विशाखा भिख्युनी धम्मशिला आणि महिला अनिता मोरघडे उपस्थित होते. डॉ. भिक्खू सम्येक बोधी यांच्या मते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवन धैर्य आणि मानवी समस्येचे प्रतीक आहे. त्यांचे जीवन प्रत्येक महिलांसाठी प्रेरणादायी स्वरूपाचे ठरते.



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवन म्हणजेच शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात स्त्रीमुक्ती स्वातंत्र्याचा मार्ग खुला केला. अशी भावना त्यांनी व्यक्त केली. याप्रसंगी महिला मजूर सोनी देवी, निर्झरी साकेत, शामकला आगरीया, संत्रा देवी आणि अनिता लोहकरे यांच्यासह दीक्षाभूमीवर कार्यरत अकरा महिला कामगारांच्या शाल श्रीफळ आणि साठीचोळी देऊन त्यांना गौरान्वित आले. या कार्यक्रमाचे संचालन शरद मेश्राम तर प्रस्तावना विशाल शुक्ला आणि आभार सुनील भोसले यांनी मानले. याप्रसंगी देवाजी रंगारी, मिलिंद थुल, संजीव मोरे, रामभाऊ बागडे, सुरेश मून, सुरेश वानखेडे, नितीन बनसोड, दिपाली रामटेके, सुनीता बोरकर, मंगला हुमने, स्वाती मेश्राम आणि बौद्ध भिखयुनी व आंबेडकरी अनुयायी बहुसंख्येने उपस्थित होते.

## एप्रिलमध्ये फिशरीज हब प्रकल्प; आईस कोल्ड स्टोरेजचे काम पूर्ण

### मनपाच्या प्रकल्पातून 5 हजार रोजगार क्षमता, केवळ ऑपरेटर एजन्सीची नियुक्ती बाकी

दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी

अकोला : महानगर पालिकेचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प १.७५ हेक्टर क्षेत्रात कोंडेश्वर येथील फिशरीज हबचे बांधकाम (सिव्हील) व तांत्रिक काम (मासे टिकवून ठेवण्याची यंत्रणा) पूर्ण झाले आहे. मासे टिकवून ठेवण्यासाठी डीप फ्रीजर तसेच आईस कोल्ड स्टोरेजची उभारणी आतापर्यंत पूर्ण झाली आहे. संयुक्त भागीदारीत मनपासोबत हा प्रकल्प राहणार असल्यामुळे ऑपरेटर एजन्सीचा सध्या शोध घेण्याचे काम हे नोडल अधिकाऱ्यांकडे सोपवण्यात आले आहे. हा प्रकल्प सुरू झाल्यानंतर जिल्हयातील मासेमारांसह युवकांना असे एकूण ५ हजार प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार मिळणार आहेत.

या प्रकल्पासाठी १ जानेवारी २०१६ रोजी करार झाला होता. तेव्हापासून विविध तांत्रिक कारणांमुळे हा प्रकल्प रखडला. तो पूर्ण होण्यास डिसेंबर २०२५ पर्यंतचा कालावधी लागला. या प्रकल्पासाठी आतापर्यंत २५ कोटी रु.च्या वर खर्च झाला आहे. या फिशरीज हब प्रकल्पात केवळ मासेच सुरक्षित ठेवण्याची सोय नसून ठोक व चिल्लर विक्रीची सुविधा देण्यात आली असून बाहेरच्या बाजुने यासाठी दुकानांचे गाळे तयार करण्यात आले आहेत. या गाळ्यांमध्ये मासे विक्रेत्यांना त्यांचे दुकान थाटता येणार आहे. तसेच येथे प्रसाधनगृह, उपाहार गृह ही तयार करण्यात आले आहे. महानगर पालिका निवडणुकीनंतर या ऑपरेटरची नियुक्ती होण्याची दाट शक्यता असून त्यानंतर या प्रकल्पाचे उद्घाटन हे एप्रिल महिन्यात होणार असल्याची माहिती मनपा प्रशासनाद्वारे देण्यात आली. जिल्ह्यात मासेमारांनी



पकडलेले ४० टक्के मासे सडतात. तसेच ते फेकून द्यावे लागतात. परंतु, फिशरिज हब तयार झाल्यानंतर येथे मोठ्या प्रमाणात माशांची साठवणूक करता येणार असून आईस कोल्ड मासे राहतील. त्यामुळे ते ताजेच राहणार आहेत. त्याचप्रमाणे डीप फ्रिजरही येथे राहणार असल्यामुळे ते मासे शहरासह जिल्ह्यातीलच नव्हे तर राज्यभरातील मासोळी बाजारात पाठवता येणार आहेत. त्यामुळे मासेही सडणार नाही. तसेच मासेमारांचे परिश्रम वाया न जाता. त्यांना त्यांच्या परिश्रमाचा पूर्ण मोबदला मिळणार आहे.

लवकर काम पूर्ण करण्याचे निर्देश दोन महिन्याआधी मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी स्वत: फिशरीज हबची पाहणी करून तेथील कामांबाबत समाधान व्यक्त केले. तसेच त्यांनी त्यावेळी बसवल्या जात असलेल्या यंत्रणेत अचूकता तसेच खात्रिलायकपणा असे कडक निर्देश दिले. त्यामुळे संबंधित यंत्रणा कामाला लागली. रखडलेले काम वेगाने पूर्ण करण्यात आले. कारण, फिशरीज हबमधील यंत्रणा उभारण्यासाठी पूर्ण तांत्रिक माहिती असलेल्या कंत्राटदार कंपनीची आवश्यकता होती. कंत्राटदाराने ठरलेल्या मुदतीत काम पूर्ण केले.

## एकात्मता विद्यालयामध्ये संस्थापक अध्यक्ष यांना आदरांजली

दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी

नागपूर :सत्यमेव जयते शिक्षण प्रसारक मंडळ नागपूर द्वारा संचालित एकात्मता उच्च प्राथमिक विद्यालय व एकात्मता हायस्कूल यांच्या संयुक्त विद्यमानाने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती व संस्थापक अध्यक्ष दिवंगत डॉ.चंद्रहास मारोतराव वंजारी यांचे चतुर्थ पुण्यस्मरणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे सचिव दशरथजी बनसोड प्रमुख पाहुणे म्हणून हायस्कूलचे मुख्याध्यापक यालेशकुमार बोरकर कार्यक्रमाचे आयोजन प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सौ.सुरेखा मानवटकर यांनी केला. कार्यक्रमामध्ये दिवंगत अध्यक्षांप्रति त्यांच्या आठवणीना उजाळा देऊन अभिवादन व आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शुभांगी कातुरे यांनी केले. कार्यक्रमाला जयमाला बारंगे, श्वेता सरटकर, वैशाली रोकडे, ममता टेकाम, पंकज देशपांडे, शैलेश कापसे, विनोद कोटगले, दुर्गा हिरेखन, गौतम बनसोड, रमेश दिघोरे, धनश्री ढेगेकर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुनिता पुसतकर व शरद उरकुडे यांनी प्रयत्न केले.



## महत्त्वाचे...

### मॅरेथॉन 2026 चे 4 जानेवारी रोजी लॉ फोरम नागपूरतर्फे आयोजन



नागपूर: लॉ फोरम नागपूरतर्फे "मॅरेथॉन 2026 – रन फॉर कॉन्स्टिट्यूशन" अंतर्गत एक विशेष सामुदायिक धावण्याचे आयोजन करण्यात येत आहे. ही मॅरेथॉन 4 जानेवारी 2026 रोजी संविधान चौक, नागपूर येथे होणार आहे.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश नागरिकांमध्ये, विशेषतः युवकांमध्ये, भारतीय संविधानाबद्दल जागरूकता निर्माण करणे, त्याबद्दल आदर वाढवणे तसेच संवैधानिक मूल्यांचा प्रसार करणे हा आहे. ही धाव केवळ शारीरिक आरोग्याला प्रोत्साहन देणारी नसून लोकशाही, समता आणि न्याय या तत्त्वांप्रती सामूहिक बांधिलकीचा संदेश देणारी आहे.

लॉ फोरम नागपूरतर्फे शहरातील नागरिक, विद्यार्थी, वकील, सामाजिक संस्था तसेच क्रीडाप्रेमींना या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे, जेणेकरून संविधानाची मूल्ये जनमानसापर्यंत पोहोचू शकतील.

### क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्रिवार अभिवादन...

खामगाव : दिनांक ०३ जाने. २०२६ स्त्री शिक्षणाच्या आद्य प्रणेत्या आणि समाजातील अनिष्ट रूढी-परंपरांविरुद्ध लढा देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आज लक्ष्मीनारायण ग्रुपच्या वतीने त्यांना त्रिवार अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले.तत्कालीन अनिष्ट प्रथा , परंपरा यांचा सक्षमपने विरोध करून काळाच्या वादळातही शिक्षण रुपी पणती विझू दिली नाही अनन्वित अत्याचार ,अपमान सहन करीत स्त्री शक्तीला ज्ञान गंगेच्या प्रवाहात आणून जागृती निर्माण करण्याचे कार्य ज्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत केले अशा क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांना आदरयुक्त अभिवादन करण्यात आले .

या वेळी मॉडेल स्कूलचे मुख्याध्यापक सुदाम जाधव,फार्मसी विभागाचे अंकित मुळे,संकेत मारके,आय.टी.आय.चे विभाग प्रमुख आकाश खंडेराव,नंदकुमार घुले, रेणुका देशमुख तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

### स्त्री शक्तीच्या आद्य शिक्षिका सावित्रीबाई फुले यांना त्रिवार अभिवादन

खामगाव : . २०२६ क्रांतीज्योती सावित्री आई फुले यांच्या जयंती निमित्त तसेच बालिका दिनी आज सर्व प्रथम दीप प्रज्वलन करून व सावित्री आई फुले प्रतिमेचे पूजन करीत कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली . तत्कालीन अनिष्ट प्रथा , परंपरा यांचा सक्षमपने विरोध करून काळाच्या वादळातही शिक्षण रुपी पणती विझू दिली नाही अनन्वित अत्याचार ,अपमान सहन करीत स्त्री शक्तीला ज्ञान गंगेच्या प्रवाहात आणून जागृती निर्माण करण्याचे कार्य ज्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत केले अशा क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांना आदरयुक्त अभिवादन करण्यात आले . शाळेतील के.जी. १ मधील अनुश्री चव्हाण ,के.जी.२ मधील वंशिका बर्डे , गौरी तायडे, नंदिनी लाहुडकर, वर्ग १ली मधील अन्वी वानखडे, देवांशी लाहुडकार, तन्वी इंगळे यांनी सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा साकारून कार्यक्रमाची शोभा वाढविली. तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी शाळेच्या मुख्यध्यापिका राजकन्या देठे, उपमुख्यध्यापिका सबा अंजुम , शिक्षिका कांचन चव्हाण, सौ प्रिया अवथळे,प्रगती मोरखडे,विक्रमसिंह ठाकूर सर सेविका नंदा हिवराळे ,वर्षा वाघमारे व मनिषा बोदडे ह्या उपस्थित होत्या

# रस्त्यावर झिंगाट झाल्याने 332 मद्यपींवर कारवाई

## मद्यप्राशन करुन वाहन चालवणाऱ्या 48 जणांवर वाहतूक पोलिसांचा कारवाईचा बडगा




दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी

यवतमाळ - जुन्या वर्षाला निरोप आणि नव्या वर्षाच्या स्वागताकरिता अनेकजण बुधवारी रात्री घराबाहेर पडले होते. फटाके फोडून आतषबाजी करीत हजारो नागरिकांनी जल्लोषात नववर्षाचे स्वागत केले. परंतु रस्त्यावर झिंगाट होऊन फिरणाऱ्या ४८ जणांसह वाहतूक नियमांचे उल्लंघण करणाऱ्या ३३२ जणांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला. चौकाचौकांत पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त लावला होता. त्यामुळे कुठेही अनुचित घटना घडल्याची नोंद नाही.

नववर्षाच्या पूर्वसंध्येला दरवर्षी मोठ्या प्रमाणात जल्लोष केल्या जातो. बुधवारी सायंकाळपासूनच जिल्ह्याभरात नववर्षांच्या स्वागताचा जल्लोष केल्या जात होते. ठिकठिकाणी वाहनांची तपासणी केल्या जात होती. दुचाकी, चारचाकी वाहन चालकांना तंबी दिल्या जात होती. तरीसुद्धा 'झिंगाट' होऊन वाहने चालवणाऱ्या ४८ जणांसह वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३३२ जणांवर पोलिसांनी कारवाई करण्यात आली.

ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलिस अधिकारी दिनेश बैसाणे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सतीश चवरे, जिल्हा वाहतूक अधिकारी ज्ञानोबा देवकते आदींनी केली. जिल्हा पोलिस दलाने मागील चार ते पाच दिवसांपासून जिल्ह्यात पोलिसांचा विशेष बंदोबस्त ठेवला होता. नववर्षाचे स्वागत करताना कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवावी, कुणीही कायद्याचे उल्लंघन करू नये, थर्टी फर्स्ट साजरा करताना दारू पिऊन वाहने चालवू नये, असेही आवाहन दलामार्फत करण्यात आले होते. कारवाई करण्यात येईल, असा इशारा जिल्हा पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी दिला होता.

## तलाठी संवर्गाच्या विविध मागण्यांसाठी जिल्ह्यात एक दिवसीय धरणे आंदोलन

दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी




यवतमाळ जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) संवर्गाच्या आर्थिक व सेवाविषयक मागण्यांबाबत गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. यासंदर्भात आतापर्यंत दहा ते बारा वेळा निवेदने सादर करण्यात आली. तसेच जिल्हा प्रशासनासोबत वेळोवेळी चर्चा झाली.

मात्र प्रत्यक्षात केवळ आश्वासनांपलीकडे काहीही निष्पन्न न झाल्याने जिल्हा प्रशासन उदासीन असल्याची भावना तलाठी संवर्गामध्ये निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर नाईलाजास्तव जिल्ह्यातील सर्व तहसील कार्यालयांसमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

तलाठी संवर्गाच्या प्रमुख मागण्यांमध्ये गेल्या पंधरा वर्षांपासून अद्ययावत न झालेली एकत्रित सेवाज्येष्ठता यादी तत्काळ जाहीर करणे, मंडळ अधिकारी पदोन्नती संवर्गात पदोन्नती देणे, कालबाह्य झालेले लॅपटॉप व प्रिंटर बदलून देणे, विनंतीनुसार बदली प्रक्रिया पूर्ण करणे, अतिवृष्टी व दुष्काळ अनुदान वाटपातील नियमानुसार प्रशासकीय खर्चाचा मेहनताना देणे, भाड्याने असलेल्या तलाठी कार्यालयांना भाडे मंजूर करणे, वार्षिक मूल्यांकन अहवालाची प्रत उपलब्ध करून देणे, वेतन निश्चिती करणे, सहा महिन्यांपेक्षा जास्त अतिरिक्त प्रभार न देणे व त्याचा मेहनताना वेळेवर अदा करणे, आदिवासी प्रोत्साहनपर भत्ता देणे, कार्यालयांना फर्निचर व मूलभूत सुविधा पुरवणे, तलाठी सजावरील कोतवाल प्रतिनियुक्ती तहसील कार्यालय किंवा अन्य ठिकाणी न करणे, गौण खनिज पथकात संरक्षण देणे, शासनाकडून मिळणारी रक्कम थेट ग्राम महसूल अधिकाऱ्यांना देणे, वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके निकाली काढणे तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील तलाठी आस्थापनेचा नियमित आढावा घेणे आदी मागण्यांचा समावेश आहे.

३१ डिसेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांनी डीएससी टोकन प्रशासनाकडे जमा केले आहेत. आंदोलनाच्या नोटीसमध्ये नमूद केल्याप्रमाणे २ जानेवारी २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. तसेच ६ जानेवारीपासून बेमुदत सामूहिक रजेवर जाण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## जीवनात स्पर्धा ही इतरांशी नसून स्वत:शी- अभिनेत्री स्पृहा जोशी:जगदंबा अभियांत्रिकी कॉलेजात स्नेहसंमेलन

दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी




यवतमाळ अभिनेत्री स्पृहा जोशी यांनी आपल्या अभिनय क्षेत्रातील अनुभव सांगत विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. जीवनात स्पर्धा ही इतरांशी नसून स्वतःशी असते, असे त्यांनी स्पष्ट केले. शिक्षणाला सर्वाधिक महत्त्व द्यावे, कारण शिक्षित आई पुढील पिढीला यशस्वी जीवनाची योग्य दिशा देते, असे मत त्यांनी खास करून मुलीकरीता मांडले.

शहरातील जगदंबा अभियांत्रिकी कॉलेज येथे वार्षिक स्नेहसंमेलन 'विंग्स-२६ चा समारोप सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या समारंभासाठी सुप्रसिद्ध मराठी चित्रपट अभिनेत्री स्पृहा जोशी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष अजाबराव वातीले, सचिव डॉ. शितल वातीले, संचालक पवन वातीले, ज्योती वातीले, प्राची वातीले, प्राचार्य डॉ. प्रवीण डाखोळे, उपप्राचार्य विजय भांबेरे, प्राचार्य डॉ. राहुल बिजवार तसेच सर्व विभागप्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होते. स्नेहसंमेलनात आयोजित विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना अभिनेत्री स्पृहा जोशी यांच्या हस्ते पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

या प्रसंगी संस्थेचे सचिव डॉ. शितल वातीले यांनी स्पृहा जोशी यांचा परिचय करून दिला. जगदंबा अभियांत्रिकी महाविद्यालयाची यशोगाथा मांडली. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयात राबवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. गुणवत्तापूर्ण शिक्षण देत सतत गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी अमरावती विद्यापीठाला दिले असून, ही परंपरा पुढेही कायम राहील, असा आशावाद व्यक्त केला. महाविद्यालयाची अल्पावधीत झालेली प्रगती ही डॉ. शितल वातीले यांच्या १६ वर्षांच्या अथक परिश्रमांचे फलित असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या शेवटी स्पृहा जोशी यांनी विद्यार्थ्यांसोबत त्याच्या चित्रपटातील लोकप्रिय गाण्यावर नृत्य सादर केले. तसेच उपस्थितांच्या प्रश्नांना अत्यंत मोकळ्या आणि दिलखुलास शैलीत उत्तरे देत संवाद साधला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समन्वयक प्रा. अमोल ढुमणे, प्रा. धनश्री पोहरे, प्रा. ओम अडपावार, प्रा. दर्शना शंमभरकर व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

अभिनेत्री जोशी हिने विद्यार्थ्यांसोबत केले नृत्य आपल्या महाविद्यालयाने सातत्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण देत सतत गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी अमरावती विद्यापीठाला दिले असून, ही परंपरा पुढेही कायम राहील, असा आशावाद व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी स्पृहा जोशी यांनी विद्यार्थ्यांसोबत त्याच्या चित्रपटातील लोकप्रिय गाण्यावर नृत्य सादर केले.

## स्व.डॉ. पंजाबराव देशमुख जयंती, स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात

### भारतीय सैन्यातील जवान सागर शंकरराव गावंडे यांचा मान्यवरांकडून विशेष सत्कार

दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी




यवतमाळ - येथील श्री गदाजी ग्रामसेवा प्रतिष्ठान बोरी (बु.) द्वारा संचालित स्व. डॉ. पंजाबराव देशमुख विद्यानिकेतन उच्च प्राथमिक शाळा, एस.एस.जी.एम. डिजिटल ग्रुप मल्टीपर्पज सोसायटी, यवतमाळ संचालित नेपच्यून इंग्लिश मिडियम प्रायमरी स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांची १२७ वी जयंती व स्नेहसंमेलन सोहळा नुकताच मोठ्या दिमाखात पार पडला.

कार्यक्रमाचे उदघाटन माजी आमदार ॲड. विजया धोटे यांनी भूषवले. त्यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शिक्षण क्रांतीच्या विचारांचा वारसा जोपासण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विलास काळे (केंद्र प्रमुख न.प. क्र. १, यवतमाळ) उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे आणि शाळेच्या शैक्षणिक दर्जाचे कौतुक केले.

या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे शाळेचे माजी विद्यार्थी सागर शंकरराव गावंडे यांचा झालेला सत्कार होता. भारतीय सैन्य दलात कार्यरत असताना "ऑपरेशन सिंदूर' मध्ये देशासाठी बजावलेल्या मौल्यवान कामगिरीबद्दल सागर गावंडे यांचा सपत्नीक विशेष सत्कार करून गौरव करण्यात आला.

याप्रसंगी शाळेतील गुणवत्ताप्राप्त विद्यार्थ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. व्यासपीठावर संस्थेच्या अध्यक्षा रजनी सायंकार, एसएसजीएम डिजिटल ग्रुपचे अध्यक्ष विक्रांत सायंकार, अपर्णा सायंकार, लोकदूत स्वामिनी ग्रुपच्या अध्यक्षा ॲड. सरोज वरदेहे, विद्या खडसे व इतर मान्यवर उपस्थित होते.

स्वरा रायते वर्ग ५ वी आणि स्वरा धोटे वर्ग ७ वी यांनी भाऊसाहेबांच्या जीवनचरित्रावर भाषण दिले.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कलागुणांनी उपस्थितांची मने जिंकली. सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी ज्ञानेश्वरराव चौधरी, शाळा समिती अध्यक्ष यांचे मार्गदर्शन लाभले मुख्याध्यापिका सरोज कुडमथे, मुख्याध्यापिका मेघा सायंकार यांच्यासह सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे संचलन प्रशांत जवादे, राकेश कळसकर, सचिन डफडे यांनी केले. सांस्कृतिक कार्यक्रमांचे संचलन लिनेश्वरी सायंकार यांनी केले. या सोहळ्याला पालक व नागरिकांची मोठी उपस्थिती लाभली होती.

## विमा क्षेत्रात 100 टक्के थेट परकीय गुंतवणुकीला भाकपकडून तीव्र विरोध:सीटूच्या वतीने देण्यात आले निवेदन

दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी




वर्धा : विमा क्षेत्रात १०० टक्के थेट परकीय गुंतवणुकीला विरोध करत भारतीय कम्युनिस्ट पक्षाने (मार्क्सवादी) जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक दिली. पॉलिट ब्युरोने अणुऊर्जा निर्मिती क्षेत्र खाजगी आणि परदेशी कंपन्यांसाठी खुले करण्याच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयाला विरोध केला आहे. विमा क्षेत्रात १०० टक्के थेट परकीय गुंतवणुकीला (एफडीए) परवानगी देण्याच्या मंत्रिमंडळाच्या निर्णयालाही पक्षाने नामंजूर केले आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने सध्याच्या संसद अधिवेशनात अणुऊर्जा कायदा, १९६२ आणि अणुऊर्जा नुकसानीसाठी नागरी दायित्व कायदा- २०१० मध्ये सुधारणा करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रस्तावित सुधारणांचा उद्देश परदेशी तंत्रज्ञान आणि उपकरण पुरवठादारांसह खासगी कंपन्यांना प्रवेश देण्याचा आहे. अणुऊर्जेसारखे धोरणात्मक आणि महत्त्वाचे क्षेत्र खाजगी कंपन्यांसाठी खुले करणे विनाशकारी ठरेल. या सुधारणांमुळे खाजगी अणुऊर्जा कंपन्यांना त्यांच्याद्वारे उत्पादित विजेचे दर ठरवण्यामध्ये पूर्ण मोकळीक मिळेल. सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्स (सीटु) व सीपीआय (एम) देशाच्या हिताचे रक्षण करण्यासाठी या सुधारणांना विरोध करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. निवेदन देताना कॉ. राजन गावंडे, राजेश काठोळे, संजय उबाळे, हरिश अग्रवाल, प्रमोद लोडम, आर. एस. ठाकरे आदी उपस्थित होते. नागरी दायित्व कायदामधील सुधारणा धोकादायक असल्याचे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे म्हणणे आहे. कारण ती अणुऊर्जा अपघातामुळे बाधित झालेल्या लोकांना दिल्या जाणाऱ्या नुकसान भरपाईला कमकुवत करते. सरकारने अमेरिकेच्या दबावाला बळी पडून, अपघातांसाठी आणि इतर अनुचित घटनांसाठी उत्पादकाला जबाबदारीतून मुक्त करण्यासाठी कायद्यात सुधारणा केली आहे.

## मलकापूर तालुक्यात दोन वेगवेगळ्या अपघातांत दोन तरुणांचा दुर्दैवी मृत्यू

दिव्य वतन / जिल्हा प्रतिनिधी

बुलढाणा : नववर्षाची नवी उमेद, नवे संकल्प आणि स्वप्नांनी भरलेली सुरुवात प्रत्येक जण करत असताना बुलढाणा जिल्ह्यात मात्र नववर्षाच्या पहिल्याच दिवशी दोन तरुणांचा अपघाती मृत्यू झाल्याने सर्वत्र शोककळा पसरली आहे. एका पाठोपाठ घडलेल्या दोन दुर्घटनांनी जिल्हा हादरून गेला असून आनंदावर विरजण पडले आहे. बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यातील हिंगणा काझी येथील पोलीस पाटील विनोद फासे यांचा मुलगा मल्हार उर्फ अभिजीत फासे (वय २०) हा जळगाव येथे शिक्षण घेत होता. काही दिवसांपूर्वी तो गावी आला होता.

१ जानेवारी २०२६ रोजी सकाळी सुमारे १० ते ११ वाजताच्या सुमारास घरच्या शेतात मका काढण्यासाठी जात असताना रणगाव शिवारात एक दुर्दैवी घटना घडली. शेतात असलेला ट्रॅक्टर केवळ मागे–पुढे करण्यासाठी अभिजीत ट्रॅक्टरवर बसला. मात्र ट्रॅक्टर सुरू होताच अचानक झटका बसला आणि क्षणात अनर्थ घडला.

अभिजीत ट्रॅक्टरच्या दोन्ही चाकांमध्ये पडला. ट्रॅक्टरच्या मोठ्या चाकाखाली त्याच्या डोक्याची एक बाजू व डावा हात दबला गेल्याने मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला आणि त्याचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेची माहिती परिसरात वाऱ्यासारखी पसरताच नागरिकांनी तातडीने अभिजीतला वाचवण्याचे प्रयत्न केले. त्याला उपजिल्हा रुग्णालय, मलकापूर येथे दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. या घटनेची माहिती उपजिल्हा रुग्णालयातील डॉ. स्वाती पाटील यांच्या वतीने वॉर्ड बॉय राजू तुकाराम गोमटे यांनी मलकापूर पोलीस ठाण्यात दिली असून, त्यानुसार आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

दरम्यान, याच दिवशी मलकापूर तालुक्यातील देवधाबा येथेही दुसरी एक दुर्दैवी घटना घडली. देवधाबा येथील रहिवासी प्रवीण संतोष कवळे (वय ३०) यांचा दुचाकी अपघातात जागीच मृत्यू झाला. ही घटना १ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सुमारे सात वाजताच्या सुमारास राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ वरील नगरच्या सर्व्हिस रोडवर मातोश्री जिनिंग फॅक्टरीजवळ घडली. एकाच दिवशी मलकापूर तालुक्यात घडलेल्या या

दोन अपघातांत दोन तरुणांचा मृत्यू झाल्याने नववर्षाच्या पहिल्याच दिवशी जिल्ह्यात शोककळा पसरली आहे. आनंद, उत्साह आणि नव्या आशांनी सुरू होणाऱ्या वर्षाच्या प्रारंभीच घडलेल्या या घटनांमुळे नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

## स्व.भाऊसाहेब गणोरकर यांचे योगदान प्रेरणादायी

### स्वर्गीय भाऊसाहेब गणोरकर 31 वा स्मृतिदिनी आयोजित कार्यक्रमात मान्यवरांचा सहभाग

दिव्य वतन / तालुका प्रतिनिधी




वरूड - शेंदुरजना घाट जनता शिक्षण संस्थाद्वारा संचालित डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयामध्ये जनता शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. ज.रा.उपाख्य भाऊसाहेब गणोरकर यांचा ३१ वा स्मृतिदिन कार्यक्रम साजरा करण्यात आला.

यावेळी जनता शिक्षण संस्थेचे संचालक ॲड. प्रभाकर सावरकर, जगदीश काळे, अरुण काळे, सतीश सोलव, चंद्रशेखर टाकरखेडे, अरुण फुटाणे, राजेंद्र बेलसरे, प्रा. प्रकाश आंजनकर, प्रा. बाबाराव ठाकरे, प्राचार्य डॉ. रा.ना. फुलारी उपस्थित होते. क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले, डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी व स्वर्गीय भाऊसाहेब गणोरकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून स्मृतिदिन कार्यक्रमाची सुरुवात झाली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रा.ना. फुलारी यांनी प्रास्ताविक केले. यावेळी ॲड. प्रभाकर सावरकर यांनी अध्यक्षीय मनोगतातून स्वर्गीय भाऊसाहेब गणोरकर यांचे शैक्षणिक कार्य व योगदानाचा अभ्यासपूर्ण आढावा घेतला.

जनता शिक्षण संस्थेची स्थापना करताना त्यावेळची सामाजिक, राजकीय व शैक्षणिक परिस्थिती यावर त्यांनी सविस्तर भाष्य केले. या जनता शैक्षणिक संकुलातून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये प्रगतीची व यशाची उंच झेप घेतलेली आहे. स्वर्गीय भाऊसाहेब गणोरकर व तत्कालीन शिक्षण प्रेमी मंडळीचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान आजच्या पिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी असल्याचे विचार त्यांनी मांडले. कार्यक्रमाचे संचालन महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख डॉ.अविनाश धोबे तर आभार डॉ. दिनेश खेरडे यांनी मानले. स्मृतिदिन कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राध्यापकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वर्गीय भाऊसाहेब गणोरकर स्मृतिदिन कार्यक्रमात सहभागी मान्यवर. ज्ञान मंदिरातून गुणवंत विद्यार्थी बाहेर स्व. भाऊसाहेब गणोरकर यांच्या जीवन व शैक्षणिक कार्याविषयी माहिती दिली. संस्थेचे अध्यक्ष जगदीश काळे यांनी गावातील व परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळावी, या उदात्त हेतूने १९५६ ला जनता शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली. स्व. भाऊसाहेब गणोरकर व त्यांचे शिक्षणप्रेमी सहकार्यांनी त्यावेळेस हे जनता शिक्षण संस्थेचे रोपटे लावले. या रोपट्याचे वट वृक्षामध्ये रूपांतर झालेले आहे. हजारो विद्यार्थी या ज्ञानमंदिरातून शिक्षण घेत आहेत. असे ते म्हणाले.

# बदलत्या राजकारणाचे वास्तव आणि लोकशाहीची कसोटी

भारताचे राजकारण सध्या एका महत्त्वाच्या वळणावर उभे आहे. लोकसभा निवडणुकांनंतर केंद्रात स्थिर सरकार कार्यरत असले, तरी राजकीय वातावरण मात्र सातत्याने तापलेले आहे. सत्ताधारी आणि विरोधक यांच्यातील संघर्ष, सत्तेचा केंद्रीकरणाकडे झुकणारा प्रवास, संस्थांची भूमिका, जनतेच्या प्रश्नांपेक्षा राजकीय आरोप–प्रत्यारोप यांनाच मिळणारे प्राधान्य — या साऱ्या घडामोडींमुळे भारतीय लोकशाहीसमोर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहत आहे. आजचे राजकारण केवळ निवडणुकांपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर ते सततच्या प्रचारात रूपांतरित झाले आहे. सोशल मीडिया, टीव्ही डिबेट्स आणि राजकीय मंचांवरून चालणारा शब्दयुद्धाचा मारा पाहता, जनतेच्या दैनंदिन प्रश्नांना दुय्यम स्थान मिळत असल्याचे स्पष्टपणे जाणवते. महागाई, बेरोजगारी, शेतकरी प्रश्न, शिक्षण आणि आरोग्य व्यवस्था यांसारख्या मूलभूत मुद्द्यांवर गंभीर चर्चा होण्याऐवजी राजकीय ध्रुवीकरणाला खतपाणी घालणाऱ्या मुद्द्यांना जाणीवपूर्वक पुढे आणले जात आहे. सत्ताधारी पक्षाच्या दृष्टीने पाहता, बहुमताचा कौल हा लोकांनी दिलेल्या विश्वासाचा कौल आहे, असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र लोकशाही ही केवळ बहुमताचीच नव्हे, तर मतभेदांची, संवादाची आणि समतोलाचीही असते. संसदेमध्ये विरोधकांचा आवाज दुर्लक्षित केला जात असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. अनेक महत्त्वाची विधेयके सखोल चर्चेशिवाय मंजूर होणे, संसदीय समित्यांकडे विधेयके न पाठवण्याची वाढती प्रवृत्ती आणि अध्यादेशांच्या माध्यमातून निर्णय लादण्याचे प्रकार लोकशाही प्रक्रियेसाठी चिंताजनक ठरत आहेत. विरोधी पक्षांची भूमिकाही तितकीच आत्मपरीक्षणाची गरज असलेली आहे. सरकारवर टीका करणे हे विरोधकांचे कर्तव्य असले, तरी पर्याय देणे आणि विश्वासार्ह नेतृत्व उभे करणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे. सध्या विरोधकांचे राजकारण अनेकदा केवळ सत्ताधाऱ्यांच्या विरोधापुरते मर्यादित राहते. एकसंध विचारसरणी, स्पष्ट विकासदृष्टी आणि जनतेशी थेट संवाद यांचा अभाव विरोधकांच्या ताकदीवर प्रश्नचिन्ह निर्माण करतो. राजकारणातील आणखी एक गंभीर बाब म्हणजे तपास यंत्रणांचा वापर. ईडी, सीबीआय, आयकर विभाग यांसारख्या संस्थांवर राजकीय दबावाखाली कारवाई होत असल्याचे आरोप वारंवार होत आहेत. दोषींवर कारवाई होणे आवश्यकच आहे; मात्र ती निष्पक्ष, पारदर्शक आणि कायद्याच्या चौकटीत झाली पाहिजे. अन्यथा, लोकांचा विश्वास या संस्थांवरून उडू लागतो, आणि लोकशाहीच्या मुळावरच घाव बसतो. राज्य पातळीवरील राजकारणही अस्थिरतेने ग्रासलेले आहे. पक्षांतर, सत्तासंघर्ष, सरकार पाडण्याचे–घडवण्याचे राजकारण, आणि सत्तेसाठी होणारी तडजोड — यामुळे मतदारांमध्ये नैराश्य वाढत आहे. जनतेने दिलेला कौल पायदळी तुडवला जात असल्याची भावना निर्माण होत असून, 'निवडणुकीचा अर्थ तरी काय?' असा प्रश्न सामान्य नागरिक विचारू लागला आहे. या साऱ्या घडामोडींमध्ये माध्यमांची भूमिकाही महत्त्वाची ठरते. काही माध्यमे सत्ताधाऱ्यांच्या बाजूने तर काही ठराविक राजकीय विचारधारेच्या बाजूने उघडपणे झुकलेली दिसतात. निष्पक्ष, निर्भीड आणि जनहिताची पत्रकारिता कमी होत चालली आहे. परिणामी, जनतेपर्यंत पोहोचणारी माहिती अपुरी, एकांगी किंवा दिशाभूल करणारी ठरण्याचा धोका वाढतो. आजच्या राजकारणात सर्वाधिक दुर्लक्षित घटक म्हणजे सामान्य जनता. निवडणुकीच्या वेळी 'जनतेसाठी, जनतेच्या विकासासाठी' असे दावे केले जातात; मात्र सत्तेवर आल्यानंतर प्राधान्यक्रम बदललेले दिसतात. लोकशाही टिकवायची असेल, तर राजकारण पुन्हा एकदा माणसांच्या प्रश्नांकडे वळले पाहिजे. विकास हा घोषणांपुरता न राहता प्रत्यक्षात दिसला पाहिजे. लोकशाही ही केवळ राजकारण्यांची जबाबदारी नाही, तर मतदारांचीही आहे. प्रश्न विचारणारी, जागरूक आणि माहितीपूर्ण जनता हीच लोकशाहीची खरी ताकद आहे. भावनिक, जातीय किंवा धार्मिक आवाहनांपलीकडे जाऊन विवेकपूर्ण निर्णय घेण्याची वेळ आता आली आहे. आजच्या राजकारणातील चालू घडामोडी पाहता, भारतासमोर मोठी संधी आणि तितकीच मोठी आव्हाने उभी आहेत. सत्ताधाऱ्यांनी संयम, संवाद आणि समावेशकतेचा मार्ग स्वीकारणे, विरोधकांनी जबाबदार व पर्यायी राजकारण उभे करणे आणि जनतेने सजग राहणे — या तिन्ही घटकांचा समतोल साधला गेला, तरच भारतीय लोकशाही अधिक मजबूत होईल. अन्यथा, सत्ता टिकेल कदाचित; पण लोकशाहीची आत्मा हरवण्याचा धोका कायम राहील.

# एक दिलनवाज व्यक्तीमत्व - श्री. चंदूभाऊ तराळ

2025 हे सरते वर्ष एक-दोन खूप गोड आठवणी देवून गेले आहे. तसे पाहाले तर प्रत्येकच वर्ष हे काहीतरी कडू-गोड आठवणींचा सोहळा असतो. आपल्याला त्या कडू-गोड आठवणींमधून सही सलामत बाजूला होवून पुढच्या वर्षात प्रवेश करायचा असतो. हा सही सलामत वाला सिद्धांत अतिशय पोकळ व भ्रामक आहे. याचे कारण असे की काही गोष्टी बऱ्याच काळपर्यंत आपल्याला जो आनंद देतात तो आपण आयुष्यभर कवटाळून ठेवतो. या प्रकारातील माझ्या लक्षात असलेली सर्वात ताजी आठवण म्हणजे 'शेरु व श्री. चंदूभाऊ' या दोन "शेर" प्रवृत्तीच्या खेळाडू वृत्तीचा झालेला परिचय! नुकत्याच रविवारी 28 डिसेंबर, 2025 रोजी वाशिम येथे महाराष्ट्र मास्टर्स अॅथलेटीक्स असोसिएशन, वाशिम, यांच्या वतीने आंतरजिल्हा स्पर्धेचे आयोजन केले गेले होते. खरेतर दर्यापूर वाल्यांना खेळाच्या आयोजनाचे अप्रूप अजिबात नाही. याचे कारण असे की आपण "तरुण उत्साही मंडळा"च्या नावेवर स्वार होवूनच मोठे झाले आहोत. "तरुण उत्साही मंडळ" हा दर्यापूरच्या इतिहासातील सुवर्ण साठा आहे. बहुतेक आपल्या जन्माच्या अगोदर किंवा जवळपास, दर्यापूर येथे, हल्ली जिथे एसटी स्टँड आहे

ते फुटबॉलचे ग्राउंड होते. तिथे फुटबॉलचे नियमित सामने व्हायचे. ते ग्राउंड पण आपण सर्वांना आठवतच असेल. खारतळेगाव, ता. अमरावती येथील श्री. भिमराव देशमुख, हे राष्ट्रीय फुटबॉल प्लेयर होते. त्यांचा या दर्यापूरच्या टीम मध्ये सहभाग होता. तसेच बनोस्यातील 'हनुमान व्यायाम शाळा' म्हणजेच 'आखाडा', 'प्रबोधन शाळे'त असलेली 'श्री शिवाजी व्यायाम शाळा' व 'भवानी वेश' स्थित असलेला 'हनुमान आखाडा' यांनी दर्यापूरच्या खेळ व जिम्नॅस्टिक्स या प्रकारामध्ये मैलाचा दगड रोवलेला आहे. दर्यापूरमधे, माझ्या माहितीनुसार सर्वप्रथम कुस्तीचा "कलर कोट" हा श्री. ओंकारभाऊ कट्यारमल, (हनुमान व्यायाम शाळा, पांचाळपुरा, बनोसा) यांनी पटकावलेला आहे. आणि त्यानंतर 'हनुमान व्यायाम शाळा', 'शिवाजी व्यायाम शाळा', 'भवानी वेश व्यायाम शाळा' यांनी अक्षरशः खिरापत वाटावी असे कबड्डी, जिमनॅस्ट, मल्लखांब (तुरळक प्रमाणात कुस्तीमध्ये) या क्रिडा प्रकारात कलर मिळविलेले आहेत. दर्यापूरला सिव्हिल लाईन्स एरियामध्ये टेनिसचा क्लब होता. त्याचे मुख्य सूत्रधार अॅड. श्री. दत्तोपंत महाजन हे होते. त्यांना तर "फादर ऑफ टेनिस" हे नामाभिदान प्राप्त झाले होते. "श्री. आनंद व श्री. राम महाजन" या बंधूंनी तर सत्तरच्या दशकात टेनिस खेळात महाराष्ट्रात दबदबा तयार केला होता. त्याचवेळी जे. डी. पाटील सांगळूदकर महाविद्यालया मध्ये प्रा. रामकृष्णराव भटकर यांनी पुढाकार घेऊन टेनिसचे कोर्ट चालू केले होते. या दोन टेनिसच्या कोर्टाचा एकत्रित परिणाम असा झाला की आपल्या पिढीपेक्षा वरच्या पिढीमध्ये टेनिसचे जवळपास विस एक तरी कलर कोट मिळालेले खेळाडू आहेत. नवीन पिढीत जिम्नॅस्टिक्स, रनिंग, बॅडमिंटन याच्यातही नैपुण्य मिळालेल्यांची संख्या मोठी आहे. श्रीमती कोकीळाबाई गावंडे यांच्या बंगल्यामधे सुध्दा टेनीस व बॅडमिंटन कोर्ट होते. "प्रताप क्रिकेट क्लब", सिव्हील लाइन्स यांनी सुध्दा बरिच वर्षे टेनिस व कॉर्क बॉलचे सामने आयोजित केलेले आहेत. या सर्व भाऊ गर्दीमध्ये एक नाव दुर्लक्षित राहाले आहे, ते म्हणजे श्री. चंद्रकांत उर्फ चंदूभाऊ तराळ! श्री. चंदूभाऊ हे जे. डी. पी. एस. महाविद्यालय दर्यापूर चे माजी विद्यार्थी आहेत.

जिमनॅस्ट या प्रकारात कलर (नागपूर विद्यापिठ) मिळवणारे ते बहूतेक एकमेव खेळाडू आहेत. त्यांची माहिती सांगतांना माझी चूक होऊ शकते, कारण त्यांचे व्यक्तिमत्व इतके अफाट आहे की त्यांचा बायोडाटा गोळा करायची माझी पात्रता नाही व हिंमत सुध्दा नाही. आपल्या गावातील क्रीडा किंवा अॅथलेटिक्स या गुणांच्या भरवशावर ज्यांना नोकरीमध्ये स्थान मिळाले त्यापैकी आवर्जून घेण्यासारखं नाव म्हणजे श्री. चंदूभाऊ, श्री. जनार्दन पतींगे, श्री. द्वारकाभाऊ शर्मा (कबड्डी) श्री. ओंकारभाऊ कट्यारमल, श्री. सुधीरभाऊ धर्माधिकारी, श्री. माधवभाऊ देशमुख (मल्लखांब) ही पटकन आठवणारी उदाहरणे आहेत. खरंतर यामध्ये आपल्या गावातील अनमोल रत्नांची नावे आठवण्यापेक्षा विसरण्याचाच प्रमाद हातून घडण्याची भीती जास्त आहे. श्री. चंदूभाऊंनी त्यांची नोकरीची कारकीर्द एमएसईबी मध्ये 'स्पोर्ट्स ऑफिसर' म्हणून सुरू केली. त्यांचे वडील "श्री. विश्वासराव तराळ" हे प्रतिष्ठित गणमान्य व्यकी होते. त्यांची आई आणि वडील यांची भाषाशैली व उच्चार हे भाषा पारंगत विद्वानालाही लाजवेल या पद्धतीची होती. काळाच्या ओघात त्यांच्या दर्यापूरच्या घराच्या फक्त खुणा शिल्लक आहेत. त्यांची क्रीडा प्रकारावर इतकी निष्ठा होती की त्यांनी नोकरीही "पाट्या न टाकत" मात्र "आट्यापाट्या"चा खेळ खेळत केली. प्रत्येक वर्षी एमएसईबी, वर्कर्स आणि ऑफिसर्स यांचे संघटन करून, त्यांना मार्गदर्शन करून, त्यांना प्रवृत्त करुन, वेगवेगळ्या ठिकाणी यांना आयोजनामध्ये भाग घ्यायला लावणे हे कार्य केले. वेळप्रसंगी अकोल्याला क्रीडा स्पर्धा आयोजित करणे हे त्यांचे नोकरीत अखंड व्रत होते. समाजात क्रीडा विश्वातीलच नाही तर इतर विषयात सुध्दा ज्या 'कौशल्या' वरती आपण नोकरीमध्ये लागलो त्या गुणाला जोपासणारे व वाव देणारे नव्वद टक्के लोक काम चुकार असतात. पण श्री. चंदूभाऊंचा क्रीडा विश्व जपणे हा श्वास होता व आजही आहे.

श्री. चंदूभाऊंची दर्यापूरची ओळख सांगायची तर त्यांचे गांधीनगर मध्ये घर आहे. विशेष ओळख म्हणजे "तराळ बंधू" हे स्टेशनरी-कटलरीचे दर्यापूर मधील जुन्या एसटी स्टँडवर असलेले प्रसिद्ध दुकान होते व आजही आहे. प्रत्येक गोष्ट माफक दरातच तिथे विकत मिळत असे, त्यामुळे त्या दुकानात प्रचंड गर्दी होत असे.

आजही त्यांचे पुतणे समर्थपणे ते दुकान दर्यापूर मध्ये चालवीत आहेत. नोकरीतून सेवानिवृत्त झाल्यावर त्यांनी "आंतरराष्ट्रीय मास्टर्स अॅथलेटिक्स फेडरेशन (MAFI) ला वाहून घेतले आहे. ही संस्था पस्तीस वर्ष वयावरील व्यक्तींकरीता (जिल्हा, राज्य, देश व आंतरराष्ट्रीय स्तरावर) खेळ स्पर्धा आयोजित करते. श्री. चंदूभाऊ यांनी महाराष्ट्र पातळीवरच्या संघटनेत बरिच वर्षे पदाधीकारी व अध्यक्ष म्हणून काम केले आहे. त्यांनी या संघटनेसाठी स्पर्धेचे जिल्हा पातळीवर तसेच महाराष्ट्र राज्य पातळीवर आयोजन सुद्धा केलेले आहे. सध्या "भारतीय मास्टर्स अॅथलेटिक्स फेडरेशन" या देशपातळीवर च्या संघटनेत ते पदाधिकारी आहेत. आपल्या गावातील "एक व्यक्ती" इतक्या मोठ्या संघटनाच्या पदावर कार्यरत आहे, ही खरोखर आपल्या करता भूषणावह बाब आहे. स्वतः वैयक्तिक खेळ खेळणे हे फक्त स्वतःचे नैपुण्य जोपासण्यासाठी असते, परंतु ज्यावेळी आपल्याला संघटन चालवावे लागते त्यावेळी आपल्याला "अष्टांग योग" जमायलाच पाहिजे. शेकडोच काय, हजारो लोकांची मने, हजारो लोकांची मते जाणून घेवून आणि यातून सुवर्ण मध्य काढत यशस्वी आयोजन करणे ही संघटकाची भूमिका असते. श्री चंदूभाऊंनी ती भूमिका आजही समर्थपणे सांभाळली आहे. नोव्हेंबर 2025 मधे "आंतरराष्ट्रीय मास्टर्स अॅथलेटिक्स स्पर्धे"चे चेन्नई येथे "भारतीय मास्टर्स अॅथलेटिक्स फेडरेशन" यांनी आयोजन केले होते. जवळपास सत्ताविस देशांमधून पस्तीस हजार खेळाडूंची तिथे नोंदणी झालेली होती. महाराष्ट्रातून सुध्दा दोनशेच्यावर खेळाडू त्यात सहभागी झाले होते. या आयोजनात भारताची जी संघटन कमिटी आहे, त्यामध्ये श्री. चंदूभाऊ पदाधिकारी आहेत.

हे आयोजन श्री. चंदूभाऊंचे कर्तुत्व सिद्ध करते. (डॉ. महेंद्र काळे त्यांच्या कार्यव्यस्ततेमुळे या स्पर्धेमध्ये भाग घेऊ शकले नाहीत. डॉ. महेंद्र काळे यांनी या अगोदर सुध्दा व गेल्या रविवारी 28 डिसेंबर, 2025 ला वाशिमला जिल्हास्तरावर भाग घेतला आहे.) श्री. चंदूभाऊ फक्त क्रीडा संघटक किंवा कुशल खेळाडूच नाहीत, तर त्यापुढे जावून एक संवेदनशील व्यक्तिमत्व या अंगाने सुद्धा आपल्याला त्यांना लक्षात ठेवावे लागेल. आपण "दर्यापूरची लोकं" दर्यापूर साठी कायम पागलच असतो. या नियमाला अपवाद श्री. चंदूभाऊ सुद्धा नाहीत. एकदा बोलण्याच्या ओघात त्यांनी सांगितले होते की, "डाक बंगल्यापासून, रेल्वेच्या रुळाच्या पलीकडे जाणारी जी कडुलिंबाची गर्द झाडी आहे, तो भाग म्हणजे जगातील सर्वात रमणीय, सुंदर व मनमोहक भाग आहे.

मला जर त्या भागाची तुलना करायची असेल तर मी इंग्लंड येथील "थेम्स नदी"च्या काठाशी असलेला जो प्रसन्न हिरवागार परिसर आहे त्याच्याशी तुलना करेल. दर्यापूरच्या या रस्त्यावर ज्याची पावले पडली आहेत ती सर्वात भाग्यवान व्यक्ती आहे." आपण या कल्पनेची रसिकता अनुभवू शकतो. श्री. चंदूभाऊंची आणखी एक ओळख म्हणजे त्यांची सामाजिक संवेदनशिलता! त्यांनी एका ओपन ग्राउंड वरती झालेल्या अतिक्रमणाचा विळखा स्वतःच्या बळानी प्रयत्नपुर्वक हाणून पाडला. चक्क कोर्टबाजी करुन ती जागा खेळ खेळण्यासाठी आरक्षित ठेवली. हा लढा त्यांच्या जीवनातील धैर्याचा, चिकाटीचा, सोशिकतेचा, सुवर्ण पैलू आहे. खरं तर अकोल्यामध्येही या लढ्याची खूप दखल घेतल्या गेली नाही. परंतु श्री. चंदूभाऊंनी कधीही नावासाठी कोणते कार्य केले नाही. त्यांच्या नसा-नसांमधून खेळ हेच रक्त वाहते आहे, त्या प्रेमापोटी हे त्यांनी केले. त्यांची आणखी एक सामाजिक बांधीलकी जरूर नमूद करण्यासारखी आहे. त्यांच्या वडीलोपार्जीत घराण्याचा, सामाजिक बांधीलकी जपण्याचा परंपरागत वारसा त्यांनी अकोल्यात जपला आहे. त्यांचे अकोल्यात गोरक्षण रोडवर दोन मजली अद्ययावत घर आहे. गोरक्षण रोड हा सध्या अकोल्यातील घराच्या किंमतीच्या बाबतीत सर्वात महागडा रोड आहे.

त्यांनी खालच्या मजल्यावर एक छोटा हॉल निट सजवून ठेवलेला आहे. राजकारणी सोडून, कोणत्याही सामाजिक कार्यासाठी, कोणत्याही जाती धर्माच्या सामाजिक संघटनेला मीटिंग घेणे, बैठक घेणे, नियोजन करणे याकरता ती जागा त्यांनी अगदी मोफत उपलब्ध करून दिलेली आहे. अशा प्रकारचे समाजाकरिता डिव्होशन दिलेले माझ्या आयुष्यामध्ये मी पाहिलेले हे पहिले-वहीले उदाहरण आहे. या सरत्या वर्षांमध्ये, श्री. चंदूभाऊंना मी आदरानी नमन करतो! नुकतेच त्यांनी वयाची पंच्याहत्तरी गाठली आहे. त्यांना चिरंतन, निरोगी व समृध्द जीवनाच्या शुभेच्छा देतो.

**उमेश पागृत,** अकोला.

# जल ही जीवन मृत्यूचा घोट बनला

'पाणी हे जीवन आहे' 'जल ही जीवन है' हे प्रसिद्ध घोष आपण सर्वांनी ऐकले आणि वाचले असालच . आता कल्पना करा, जर पाणी, जीवनासाठी आवश्यक असेल; जर ते मृत्यूचे कारण बनले तर...हे प्रत्यक्षात घडले आहे हे जाणून तुम्हाला धक्का बसेल. देशातील सर्वात स्वच्छ शहर इंदूर... अन्नासाठी प्रसिद्ध असलेले शहर... आज सर्वत्र बातम्यांमध्ये आहे.

यावेळी, कारण अगदी उलट आहे. इंदूरमधील भगीरथपुरा येथे, १५ जणांनी आपले जीवन वाचवण्यासाठी जे पाणी प्यायले ते त्यांच्यासाठी विष बनले, ज्यामुळे त्यांचा अकाली मृत्यू झाला.

काही घरांमध्ये, प्रार्थनापूर्वक जगण्याचा प्रकाश अकाली विझला, तर काहींमध्ये, कमावणारा मरण पावला. काहींमध्ये, संपूर्ण कुटुंबासाठी भाकरी बनवणारे हात कमकुवत झाले आणि काहींमध्ये, तरुण आकांक्षा मरण पावल्या.

कारण- व्यवस्थेची बेजबाबदार वृत्ती... सरकारी अधिकाऱ्यांची कुंभकरणीय झोप आणि सामान्य लोकांना त्यांच्या नशिबावर सोडण्याची त्यांची कार्यशैली... भगीरथपुरा रक्ताचे अश्रू ढाळत आहे, परंतु ही केवळ इंदूरची दुःखद कहाणी नाही ज्याने स्वच्छतेत आघाडीवर राहिल्याबद्दल सात वेळा स्वतःच्या पाठीवर थाप मारली आहे, तर ही देशभरातील कोट्यवधी लोक अशाच दूषित पाण्याने जगत असल्याची धक्कादायक कहाणी आहे.भारतातील पाण्याच्या दूषिततेकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.

दूषित पाण्यामुळे होणारे मृत्यू अत्यंत चिंताजनक आहेत, कारण यामुळे कॉलरा, टायफॉईड, अतिसार (जुलाब) यांसारखे गंभीर आजार पसरतात, ज्यात लहान मुलांचा बळी जास्त जातो, जागतिक स्तरावर दरवर्षी लाखो मृत्यू होतात आणि भारतातही इंदूरसारख्या शहरांमध्ये अलीकडेच दूषित पाण्यामुळे अनेक मृत्यू झाले आहेत, ज्यामुळे प्रशासनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पाणी दूषित होण्याची कारणे म्हणजे सांडपाणी, औद्योगिक कचरा आणि खराब पाईपलाईन आहेत, ज्यामुळे जिवाणू, विषाणू आणि रासायनिक पदार्थांचा प्रसार होतो, जे मानवी आरोग्यासाठी धोकादायक आहेत.

भारतात शुद्ध पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर आहे आणि कोट्यवधी लोक सुरक्षित पाण्यापासून वंचित आहेत.नीति आयोगाच्या अहवालानुसार, देशातील सुमारे ६० कोटी लोक तीव्र जलतणावाखाली जगत आहेत. अलीकडील

इंदूरमधील भागीरथपुरा भागात दूषित पाण्यामुळे अनेक मृत्यू झाले, ज्यात सांडपाणी पिण्याच्या पाईपलाईनमध्ये मिसळले होते. ज्या परिसरात ही घटना घडली, त्या ठिकाणी सुमारे १५,००० लोक राहतात. दूषित पाणीपुरवठ्यामुळे दिवसभर महिला आणि मुलांसह नवीन रुग्ण समोर येत राहिले. त्यानंतर काहींची तब्येत इतकी खालावली की, थेट त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेमुळे आरोग्य विभागावर प्रश्नचिन्ह उभे राहिले असून, जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे.

या आधी देखीलमेळघाटात दूषित पाण्यामुळं दोघांचा मृत्यू झाला होता.भारतातील लाखो लोकांना अजूनही सुरक्षित पिण्याचे पाणी मिळत नाही.

जागतिक आरोग्य संघटना (WHO) आणि युनिसेफ यांनी वारंवार इशारा दिला आहे की असुरक्षित पिण्याचे पाणी एक गंभीर धोका निर्माण करते आणि सुरक्षित आणि व्यवस्थापित पिण्याच्या पाण्याची उपलब्धता प्रत्येकासाठी आवश्यक आहे. ते असेही निदर्शनास आणून देतात की ज्या देशांमध्ये पाण्याची गुणवत्ता खराब आहे, त्या देशांमध्ये आरोग्य व्यवस्थांवरील भार वाढेल आणि विकास मंदावू शकतो.मात्र स्वातंत्र्याच्या ७९ वर्षानंतर देखील आम्हीं सर्वसामान्य नागरिकांना मूलभूत गरजा पुरवू शकलो नाही..असे खेदाने म्हणावे लागत आहे.मूलभूत गरजांकडे दुर्लक्ष म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य दळणवळण आणि शिक्षणासारख्या आवश्यक गोष्टींकडे दुर्लक्ष करणे, ज्यामुळे व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक आणि भावनिक विकासावर गंभीर परिणाम होतो, जसे की बालकांमध्ये कुपोषण, भावनिक पोकळी निर्माण होणे, आणि प्रौढांमध्ये असुरक्षितता व नैराश्य येऊ शकते; याकडे दुर्लक्ष केल्यास व्यक्तीचे कल्याण धोक्यात येते आणि दारिद्र्याचे दुष्टचक्र सुरू राहते.

**प्रा डॉ सुधीर अग्रवाल**
वर्धा

# माझ्या बोलीभाषेची महानता आणि मराठी भाषेतील योगदान या विषयावर राज्यस्तरीय लेख स्पर्धा

जगातील बहुतेक प्रमुख भाषांप्रमाणेच मराठी भाषाही एकाहून अधिक पद्धतींनी बोलली जाते. मराठी या मुख्य भाषेशी नाते कायम ठेवलेली, तिची बोलीभाषा दर १२ कोसांगणिक उच्चारांत, शब्दसंग्रहांत, व वाक्प्रचारांत बदलत रहाते. मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती एक संस्कृती आहे. तिच्या मातीत असंख्य उपभाषांचे, बोलींचे रोप बहरलेले आहे. महाराष्ट्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यांत बोलीभाषांचे वैविध्य आढळते. बोली भाषेतील विविधतेमुळे मराठी भाषेची ताकद वाढली असून तिचे सौंदर्य अधिक खुलले आहे. या बोलीभाषांमधील साहित्य, लोकसंस्कृती, गाणी, नाटकं, प्रवचनं यांनी मराठीला अधिक व्यापक आणि जिवंत बनवले आहे. मराठी भाषा ही समुद्र आहे तर तिच्यात मिसळणाऱ्या बोलीभाषा या विविध नद्यांप्रमाणे आपले भाषिक सौंदर्य तिच्यामध्ये कायम मिसळत राहते. हा ओघ असाच कायम असणे खूप गरजेचे आहे. शब्दांचे वैशिष्ट्य, शब्दांचा गोडवा, शब्दांचे अर्थ, त्याची आशयघनता, काळाच्या गतीमध्ये लुप्त होऊ नये.मराठी भाषेच्या अनेक बोलीभाषा आहेत, ज्या भौगोलिक प्रदेशानुसार बदलतात, जसे की विदर्भात वऱ्हाडी, नागपुरी; कोकणात मालवणी, कोकणी, आगरी; पश्चिम महाराष्ट्रात कोल्हापुरी, पुणेरी; आणि खानदेशात अहिराणी, खानदेशी यांसारख्या बोलीभाषांचा समावेश होतो, ज्या शब्दसंग्रह आणि उच्चारात वेगळेपण दर्शवतात पण लेखनात प्रमाण मराठीचा वापर होतो. आजही मराठी भाषेच्या जडणघडणीत या बोलीभाषांचा मोलाचा वाटा आहे. बोलीभाषांचे संवर्धन आणि त्यांचे लेखन-साहित्यिक योगदान पुढे नेणे, हे मराठी भाषेच्या उज्ज्वल भविष्यासाठी आवश्यक आहे.




मराठी वृत्तपत्र लेखक संघाच्या वतीने मराठी विचारधारा प्रतिष्ठान पुरस्कृत कामगारनेते वसंतराव होशिंग स्मृती राज्यस्तरीय लेख स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. स्पर्धेचा विषय "माझ्या बोलीभाषेची महानता आणि मराठी भाषेतील योगदान" हा विषय असून शब्दसंख्या १५०० आहे. स्पर्धेत भाग घेणाऱ्यांनी स्व-बोलीभाषेचा अधिकाधिक वापर करून मराठी साहित्य आणि चित्रपट-नाट्यकलाकृतील योगदानाचा सविस्तर आढावा घेऊन हा लेख लिहून पाठवावा. लेख सुवाच्च अक्षरात लिहून किंवा देवनागरी फॉन्टमध्ये टाईप करून ९१६७३६४८७० यावर दिनांक ३१ जानेवारी २०२६ पर्यंत पाठवावा, पारितोषिक वितरण समारंभ कविश्रेष्ठ कुसुमाग्रज जन्मदिन मराठी भाषा दिवस साजरा करण्यात येणार त्या कार्यक्रमात होणार आहे असे आवाहन स्पर्धा प्रमुख सुनील कुवरे यांनी केले आहे.

# देश महत्त्वाचा की खेळ ?

सध्या बांगलादेशात हिंदूंवर होत असलेला अमानुष अत्याचार, मंदिरांची तोडफोड, हत्या, आणि जीव मुठीत धरून जगण्याची वेळ आलेल्या हिंदूंची अवस्था पाहता प्रत्येक संवेदनशील भारतीयाच्या मनात तीव्र संताप आणि वेदना निर्माण झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर भारताने बांगलादेशविरोधात कठोर पावले उचलावीत, अशी मागणी देशभरातून होत आहे आणि त्याची प्रकर्षाने आवश्यकता देखील आहे.

अशा अत्यंत गंभीर परिस्थितीत आय.पी. एल्.च्या लिलावात अभिनेता शाहरुख खान मालकीच्या कोलकाता नाईट रायडर्स (के. के.आर.) संघाने बांगलादेशी गोलंदाज मुस्तफिजूर रहमान याला तब्बल ९.२ कोटी रुपयांची बोली लावून संघात सामील करून घेणे, हे कितपत योग्य आहे?

बांगलादेशातील हिंसाचार, तिथे वाढलेल्या भारतविरोधी कारवाया, सीमेवरील तणाव या सर्व परिस्थितीत भारताचे शत्रू राष्ट्रांपासून रक्षण करणे असे गंभीर मुद्दे समोर असताना; शत्रूराष्ट्राला साथ देणाऱ्या देशाच्या खेळाडूंवर पैशांची उधळण करणे, याला काय म्हणावे? ही एक प्रकारे देशविरोधी कृती आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. खेळाला सीमारेषा नसतात, हे अगदी योग्य आहे. मात्र जेव्हा राष्ट्राच्या सुरक्षेचा आणि अखंडतेचा प्रश्न असतो तेव्हा "देशापेक्षा खेळ महत्वाचा" की "खेळापेक्षा देश महत्वाचा" याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा.

बांगलादेशातील काही कट्टरपंथी संघटना आणि पाकिस्तानची गुप्तचर यंत्रणा आय.एस. आय. यांच्या संगनमताने भारताविरोधात षड्यंत्र रचले जात असल्याच्या बातम्या वारंवार समोर येत आहेत. भारताच्या ईशान्येकडील राज्यांना मुख्य भूमीशी जोडणारा 'सिलिगुडी कॉरिडॉर' (चिकन नेक) हा भाग शत्रूराष्ट्रांच्या निशाण्यावर आहे. अशा परिस्थितीत ज्या देशातील सरकार आणि संघटना भारताच्या विरोधात कारस्थान करत आहेत, त्याच देशाच्या खेळाडूला कोट्यवधी रुपये देणे, नैतिकदृष्ट्या अयोग्य तर आहेच आणि देशहिताला धक्का देणारे आहे.

त्यामुळे "देश महत्त्वाचा की खेळ?" याचा गांभीर्याने विचार करण्यासोबतच या निर्णयाचा विरोध करणे आवश्यक आहे.

सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा

दिव्य वतन हे दैनिक वृत्तपत्र प्रकाशक मालक मुख्य संपादक गोपाल आनंदराव कडुकर यांनी कार्यालय हाऊस नंबर १८ निवास सोसायटी स्वामी समर्थ मंदिर जवळ घोगली रोड बेसा तालुका जिल्हा नागपूर - ४४००३४ येथून प्रकाशित केले. संपर्क मो. ७७०९३७७५१०

## महत्त्वाचे...



### पुण्यात शिवसेनेचा 'शंखनाद'

पुणे महापालिका निवडणुकीत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने १२० उमेदवार मैदानात उतरवले आहेत. "आमच्या मित्रपक्षाला वाटले होते की आम्ही ४० उमेदवारही उभे करू शकणार नाही, पण आम्ही काही तासांतच १२० जणांना ताकद दिली," अशा शब्दांत उदय सामंत यांनी भाजपचे नाव न घेता त्यांच्यावर निशाणा साधला. तर "आम्हाला कोणावरही टीका करण्याची गरज नाही, कारण ते काम अजित पवार चोख पार पाडत आहेत," असा टोलाही सामंत यांनी लगावला.शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे मंत्री उदय सामंत यांनी आज पुण्यात शिवसेनेच्या प्रचाराचा नारळ फोडला. यावेळी बोलताना त्यांनी भाजप आणि अजित पवार गटावर शालजोडीतले टोले लगावल, पुण्याचा पुढचा महापौर शिवसेनेच्या मदतीशिवाय होऊ शकणार नाही, असा ठाम विश्वास व्यक्त केला. इतिहासात पहिल्यांदाच शिवसेना पुण्यात इतक्या मोठ्या प्रमाणावर १२० जागांवर निवडणूक लढवत आहे.

उदय सामंत म्हणाले, "आपला पक्ष पुण्याच्या विकासावर बोलणारा आहे, त्यामुळे आपण कोणावरही वैयक्तिक टीका करायची नाही. टीका करण्याचे काम आमचे मित्र अजित पवार पूर्ण करत आहेत.

### सावित्रीबाई फुलेंचे जन्मगाव नायगावच्या नामांतराची मागणी



सातारा - क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मगावी म्हणजेच नायगाव येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एक मोठी घोषणा केली आहे. "नायगावचे नामांतर सावित्रीबाईंच्या नावाने करावे अशी मागणी होत आहे; जर ग्रामसभेने तसा ठराव दिला, तर राज्य मंत्रिमंडळ एका मिनिटात त्याला मंजुरी देईल," असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९५ व्या जयंतीनिमित्त नायगाव येथे आयोजित कार्यक्रमात राज्याचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी नायगावचे नामांतर क्रांतीज्योती सावित्रीनगर करण्याची मागणी केली होती. या मागणीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. नायगावच्या ग्रामसभेने तसा निर्णय घ्यावा आणि तो प्रस्ताव मंत्री जयकुमार गोरे यांच्यामार्फत सरकारकडे पाठवावा. असा प्रस्ताव आल्यास आमचे मंत्रिमंडळ विनाविलंब त्याला विनाविलंब मंजुरी देईल, असे आश्वासन फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री म्हणाले की, मागील वर्षी याच दिवशी मी नायगावला आलो होतो आणि १० एकर जागेवर स्मारक उभारण्याची घोषणा केली होती. या कामाची जबाबदारी मी मंत्री जयकुमार गोरे यांच्यावर सोपवली होती. "घोषणेच्या एका वर्षाच्या आत जागा मिळणे, आराखडा मंजूर होणे आणि प्रत्यक्ष कामाचे टेंडर निघून सुरुवात होणे, असे यापूर्वी कधीच घडले नव्हते. जयकुमार गोरे यांनी रेकॉर्ड स्पीडमध्ये हे काम पूर्ण करून दाखवले आहे," असे गौरवोद्गार फडणवीस यांनी काढले.

---

## मराठी साहित्य संमेलनाला गालबोट

# संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्या तोंडाला फासले काळे; आंदोलक पोलिसांच्या ताब्यात

दिव्य वतन /वृत्तसंस्था




सातारा - साताऱ्यात आयोजित अखिल भारतीय मराठी संमेलनात आज एक खळबळजनक घटना घडली. या संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्या तोंडाला आज एका व्यक्तीने काळे फासले. हा व्यक्ती रिपाइंचा कार्यकर्ता असल्याचा दावा केला जात आहे. त्याने विनोद कुलकर्णी यांच्या तोंडाला काळे का फासले? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण यामुळे साहित्य वर्तुळात एकच खळबळ माजली आहे.

साताऱ्यातील मराठी साहित्य संमेलनाचे शुक्रवारी सकाळी साहित्यिक डॉक्टर मृदुला गर्ग यांच्या हस्ते व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन झाले. त्यानंतर आज दुसऱ्या दिवशी संमेलनात वेगवेगळे कार्यक्रम सुरू असताना संदीप जाधव नामक एका व्यक्तीने संमेलनाचे कार्याध्यक्ष विनोद कुलकर्णी यांच्यावर हल्ला केला. त्याने विनोद कुलकर्णी यांच्या तोंडाला काळे फासले. अचानक घडलेल्या या घटनेमुळे सर्वचजण स्तब्ध झाले. स्वतः कुलकर्णी यांनाही काहीक्षण काय झाले हे समजले नाही. संदीप जाधव यांनी हा हल्ला का केला? हे अद्याप स्पष्ट झाले नाही. पण ते रिपाइंचे कार्यकर्ते असल्याचे सांगितले जात आहे.

घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल

या घटनेचा एक व्हिडिओही सोशल मीडियात व्हायरल झाला आहे. त्यात गळ्यात निळा रुमाल असलेले संदीप जाधव 'जय जवान, जय किसान'च्या घोषणा देत विनोद कुलकर्णी यांच्या तोंडाला काळे फासताना दिसत आहेत. काळे फासल्यानंतर हल्लेखोर व्यक्ती राष्ट्रगीत म्हणतानाही व्हिडिओत दिसत आहे. ही घटना व्यासपीठावर जाणाऱ्या पायऱ्यांजवळ घडली. त्यानंतर आयोजकांनी विनोद कुलकर्णी यांना सावरत दुसऱ्या बाजूला नेले. शाहूपुरी पोलिसांनी आंदोलनकर्त्याला ताब्यात घेतले आहे. त्यांनी गनिमी कावा करून हे आंदोलन केले. केमिकलमुळे विनोद कुलकर्णी यांना श्वास घेण्याचा त्रास होत आहे.

विनोद कुलकर्णी यांनी पत्रकारांशी संवाद साधताना या हल्ल्यावर भाष्य केले आहे. ते म्हणाले, मी प्रकाशक कट्ट्यातून काही पुस्तकांचे प्रकाशन करून बाहेर येत होतो. 2-3 हल्लेखोरांनी माझ्या डोळ्यात केमिकलसारखे काहीतरी गोष्ट घातली. त्यांच्याकडे धारदार शस्त्रेही होती. त्यांनी संमेलन उधळून लावू, संमेलन होऊ देणार नाही आणि तुम्हाला संपवू अशा प्रकारची भाषा वापरली. त्यांचा व माझा कोणताही संपर्क नाही. मला कोणता इशाराही आला नव्हता. पण विश्वास पाटील अध्यक्ष झाल्यापासून हे संमेलन उधळवून लावण्याच्या धमक्या येत होत्या. पण पोलिसांनी प्रचंड काळजी घेतली होती. त्यामुळे असे काही घडेल असे वाटत नव्हते.

आताही पोलिसांनी एका हल्लेखोराला ताब्यात घेतले आहे. पोलिस त्याचा योग्य तपास करून हल्लेखोरांना शासन करतील असा मला विश्वास आहे. मी नेहमची सरकार व हिंदी सक्तीविरोधात भूमिका घेतली. सरकारविरोधात माझा संघर्ष सुरू आहे. मी मराठी भाषेसाठी लढणारा कार्यकर्ता आहे. सरकारने हिंदी लागू नये किंवा साहित्य क्षेत्रात सरकारचा असू नये ही माझी भूमिका आहे. त्यामुळे कुणी कशासाठी हल्ला केला? कुणी करायला लावला का? याच्या तळाशी पोलिसच जाऊ शकतील. माझा वैयक्तिक कुणावर काही संशय नाही. आम्ही पोलिसांकडे तक्रार करतोय. पोलिस तपास करून योग्य तो न्याय देतील अशी मला खात्री वाटते, असे ते म्हणाले.

दुसरीकडे, संभाजी ब्रिगेडने साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांना त्यांच्या संभाजी या कादंबरीमधील छत्रपती संभाजी महाराज यांच्याविषयी केलेल्या लिखाणाविषयी निर्वाणीचा इशारा दिला होता. विश्वास पाटील यांनी ऐतिहासिक तथ्यांची मोडतोड करून संभाजी महाराजांच्या प्रतिमेला धक्का पोहोचवला आहे. त्यामुळे त्यानी तत्काळ जाहीर माफी मागावी. अन्यथा साहित्य संमेलन उधळवून लावले जाईल, असे संभाजी ब्रिगेडने म्हटले होते. विश्वास पाटील जेम्स लेनचे मावस भाऊ आहेत का? असा सवालही या संघटनेने या प्रकरणी केला होता.

---

# नाशिक शिंदेगटातील वाद उफळला

## तिकीट न मिळाल्याने कार्यकर्त्याचा पत्नीसह आत्महत्येचा इशारा

दिव्य वतन /वृत्तसंस्था





नाशिक- महानगरपालिका निवडणुकीच्या तिकीट वाटपावरून नाराज इच्छुकांनी चांगलाच गोंधळ घातल्याचे मागील दोन-चार दिवसांपासून पाहायला मिळत आहे. नाशिकमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत मोठी बंडाळी उफाळून आली आहे. उमेदवारी न मिळाल्याने संतप्त झालेल्या एका इच्छुक उमेदवाराने थेट पत्नीसह आत्महत्येचा इशारा दिल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

नाशिकमध्ये भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेनेत युती होऊ शकली नाही, उलट शिंदेंच्या सेनेने अजित पवारांच्या राष्ट्रवादीशी हातमिळवणी करत भाजपला एकाकी पाडले आहे. मात्र, आता स्वतःच्याच पक्षात तिकीट वाटपावरून निर्माण झालेला असंतोष रोखताना नेत्यांची नाकी नऊ येत आहेत. नाशिकमधील प्रभाग क्रमांक ३१ मधून उमेदवारीसाठी इच्छुक असलेले शिवा तेलंग यांनी सोशल मीडियावर एक पत्र पोस्ट करून खळबळ उडवून दिली आहे. शिवा तेलंग यांनी तिकीट वाटपावरून पत्नीसह आत्महत्येचा इशारा दिला असून, प्रमुख नेत्यांवरही गंभीर आरोप केलेत.

शिवा तेलंग यांनी आपल्या पत्रात माजी नगरसेवक सुदाम ढेमसे यांच्यासह इतर प्रमुख नेत्यांवर गंभीर आरोप केले आहेत. २०२२ पासून प्रभाग ३१ मध्ये सक्रिय असूनही केवळ राजकीय वापर करून घेतला आहे. २९ डिसेंबरला कॅनडा कॉर्नर येथे एबी फॉर्मचे वाटप सुरू असताना मोठ्या प्रमाणात पैशांची देवाणघेवाण झाली. एबी फॉर्मसाठी पैशांची मागणी करण्यात आली आणि पैसे घेऊनच फॉर्म देण्यात आले. एकाच प्रभागात दोन जणांना एबी फॉर्म दिल्याने संभ्रम निर्माण झाला. हेमंत गोडसे, विजय करंजकर, जयंत साठे, राजू लवटे, आणि प्रवीण बंटी तिदमे यांसारख्या नेत्यांचा या प्रक्रियेत सहभाग असल्याचा दावा त्यांनी केला.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊनही स्थानिक पातळीवर वरिष्ठांच्या आदेशाला फेटाळण्यात आले. मी उद्या तुमच्यामध्ये नसणार आहे.

---

# गुन्हेगाराने मर्डर केला, तर त्याचे खानदान दोषी नसते

## गुंडांच्या घरात दिलेल्या उमेदवारीवर अजित पवार स्पष्टच बोलले, भाजपरही टीका

दिव्य वतन /वृत्तसंस्था



पुणे महापालिका निवडणुकीसाठी कुख्यात गुंडांच्या घरातील सदस्यांना 'घड्याळ' चिन्हावर उमेदवारी मिळाल्यामुळे विरोधकांनी अजित पवारांना लक्ष्य केले होते. यावर आज अजित पवार यांनी प्रतिक्रिया देत, गुन्हेगाराने मर्डर केला तर त्याचं खानदान दोषी नसते, असे म्हणत वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. अजित पवार आणि आरपीआयचे नेते सचिन खरात यांची संयुक्त पत्रकार परिषद पार पडली. यावेळी पत्राकरांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना अजित पवारांनी रोखठोक भूमिका मांडली.

राष्ट्रवादी काँग्रेसने पुणे महापालिका निवडणुकीत कुख्यात गुंड गजा मारणे याची पत्नी जयश्री मारणे यांना उमेदवारी दिली आहे. त्यांनी पक्षाच्या एबी फॉर्मवर आपला उमेदवारी अर्ज भरला आहे. गजा मारणे सध्या तुरुंगात आहे. तो आपल्या काळ्या कारवायांप्रकरणी कुख्यात आहे. एवढेच नाही तर राष्ट्रवादी कुख्यात गुंड बापू नायर याच्या पत्नीलाही उमेदवारी दिली आहे. याशिवाय कुख्यात गुंड बंडू आंदेकर याची भावजय लक्ष्मी आंदेकर व सून सोनाली आंदेकर यांनाही राष्ट्रवादीने उमेदवारी दिली आहे. पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीने ह्या उमेदवारी दिल्यामुळे अजित पवारांवर टीकेची झोड उठली आहे.


अजित पवार यांनी स्पष्ट केले की, संबंधित जागा ही आरपीआयचे सचिन खरात यांच्यासाठी सोडण्यात आली होती. चिन खरात आणि सीताराम गंगावणे यांनी सांगितले की, त्यांचे अधिकृत चिन्ह पोहोचायला वेळ लागेल, त्यामुळे त्यांनी राष्ट्रवादीच्या 'घड्याळ' चिन्हाची मागणी केली. मी माझ्या मित्रपक्षाला जागा दिली आहे. तिथे कोणाला उमेदवारी द्यायची हा सर्वस्वी त्यांचा अधिकार आहे. मी माझ्या पक्षाचा अधिकृत उमेदवार तिथे दिलेला नाही.

गुन्हेगारांच्या नातेवाईकांना उमेदवारी देण्यावरून होणाऱ्या टीकेवर अजित पवार यांनी अत्यंत रोखठोकपणे आपली भूमिका मांडली. ते म्हणाले, "जर एखाद्याने हत्या केली, तर त्याचे संपूर्ण कुटुंब त्याला जबाबदार आहे असे म्हणणे चुकीचे आहे. उद्या मी काही गुन्हा केला तर त्याच माझ्या पत्नीचा काय दोष आहे? माझा मुलांचा, मुलींचा किंवा सूनांचा काय दोष आहे? असं नाहीय. जर एखाद्याने हत्या केली तर त्याचं संपूर्ण खानदान त्याला जबाबदार आहे, असे म्हणण्याचे कारण नाही. ती विकृती असते. काही चुकीच्या गोष्टी असतात?" असे सांगत त्यांनी वादावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला.यावेळी बोलताना अजित पवार यांनी भाजपवर पुन्हा एकदा जोरदार हल्ला चढवला. "भाजपच्या कारभाराला पुणेकर वैतागले आहेत. भाजपच्या कारभारावर पुणेकर राग, चीड व्यक्त करतील. पुण्याचे कारभारी बदला. त्रिकुटाकडे असलेली सत्ता माझ्याकडे द्या. राज्यात आणि केंद्रात भाजपची सत्ता आहे. पण पुण्याच्या कारभाऱ्यांकडे इच्छाशक्तीचा अभाव, पाठपुराव्याची क्षमता नाही", अशी टीका अजित पवारांनी केली. "एकहाती सत्ता द्या, आमची प्रशासनावर पकड आहे. पुण्याचा पिंपरी चिंचवडप्रमाणे विकास करू," असे अजित पवार म्हणालेत.

---

# 'फ्लड डायव्हर्शन'चा पहिला टप्पा लवकरच:शहरांना पुरापासून मिळणार संरक्षण अन् दुष्काळी भागाला पाणी - मुख्यमंत्री फडणवीस

दिव्य वतन /वृत्तसंस्था



सांगली- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगलीत भाजपच्या महापालिका निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ फोडला. यावेळी त्यांनी सांगली व कोल्हापूर सारख्या शहरांचे पुराच्या पाण्यापासून संरक्षण करण्यासाठी फ्लड डायव्हर्शन प्रकल्पाचा पहिला टप्पा लवकरच सुरू होणार असल्याचे स्पष्ट केले. फ्लड डायव्हर्शन प्रकल्पामुळे सांगली व कोल्हापूर सारख्या शहरांचे पुराच्या पाण्यापासून संरक्षण होईल. हे पाणी पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील दुष्काळी भागाकडे वळवले जाईल. यामुळे एकीकडे आपल्या शहरांना पुराच्या पाण्यामुळे संरक्षण मिळेल आणि दुसरीकडे दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना जिवनदान मिळेल, असे ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आज क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती आहे. त्या निमित्ताने मी सांगलीतून भाजपच्या महापालिका निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी एकदा सांगलीत आले होते. तेव्हा ते म्हणाले होते, सांगली सर्वात चांगली. त्यामुळे मी ठरवले की, महायुतीच्या प्रचाराचा शुभारंभ मुंबईत सायंकाळी होईल. पण तत्पूर्वी, सांगलीतून भाजपच्या प्रचाराचा शुभारंभ करण्याचा निर्णय आम्ही घेतला. मागच्या महापालिका निवडणुकीत मी सांगलीत आलो होतो. तेव्हा काही आश्वासने दिली होती. तसेच जनतेला भाजपच्या ताब्यात महापालिका सोपवण्याचे आवाहनही केले होते. त्यानंतर महापालिकेची सूत्रे भाजपच्या हातात आली. त्यानंतर आम्ही दिलेली आश्वासने पूर्ण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला.

फ्लड डायव्हर्शनचा पहिला टप्पा लवकरच

मुख्यमंत्री म्हणाले, सांगली व कोल्हापुरात आलेल्या महापुरात अमाप नुकसान झाले. त्यानंतर आम्ही फ्लड डायव्हर्शनचा पहिला प्रोजेक्ट राबवण्याचा निर्णय घेतला. 2 टप्प्यांत होणाऱ्या या प्रकल्पावर 4 हजार कोटींचा खर्च होणार आहे. त्याचा सांगलीतील पहिला पहिला टप्पा लवकरच सुरू होणार आहे. त्यासाठी 591 कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या प्रकल्पामुळे पुराचे पाणी शहरात न येता पश्चिम महाराष्ट्र व मराठवाड्यातील दुष्काळी भागात वळवण्यात येईल. यामुळे एकीकडे आपल्या शहरांना पुराच्या पाण्यामुळे संरक्षण मिळेल आणि दुसरीकडे दुष्काळी भागाला त्या पाण्यामुळे शेतकऱ्याला जिवनदान मिळेल.

आपल्या महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले. याबाबतीत आपण दुसऱ्या क्रमांकावर आहोत. आज महाराष्ट्रातील 50 टक्के लोकसंख्या शहरात राहते. 6 कोटी लोकं 40 हजार गावांत राहतात आणि 6 कोटी लोकं 400 शहरांत राहतात. 6 कोटींपैकी साडेचार कोटी लोकं सांगलीसारख्या 29 शहरांत राहतात. त्यामुळे शहरांत राहणाऱ्या लोकांच्या जिवनात सकारात्मक बदल घडवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

मागील 70 वर्षांत शहरांचा पडला होता विसर

फडणवीस पुढे म्हणाले, मागील 70 वर्षांत गावांचा विकास म्हणजे देशाचा विकास ही भूमिका मांडण्यात आली. ही भूमिका चूक नव्हती. पण ही भूमिका मांडताना आपण भारतात शहरेही आहेत याचा विसरलो. शहरांतही लोकं राहतात. त्यांच्यासाठीही मुलभूत सोयीसुविधा केल्या पाहिजेत. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, रोजगार यासाठी गावातील लोक शहरात येत आहेत. यामुळे शहरांच्या गरजा वाढत आहेत. शहरात लोक आले की, त्यांना राहण्यासाठी जागा मिळत नाही. त्यातून अतिक्रमणे होतात. झोपडपट्ट्या तयार होतात. लोक जागा मिळेल त्या ठिकाणी बसतात. पिण्याच्या पाण्याचे प्रश्न निर्माण होतात. घनकचऱ्याच्या व्यवस्थापनाचे प्रश्न निर्माण होतात.

पर्यावरणाचे प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे 70 वर्षे आपण शहरांसाठी काहीच केले नाही. पण देशात पंतप्रधान नरेंद्र मोदींचे सरकार आल्यानंतर शहरीकरणाला अभिशाप न समजण्याचे निर्देश दिले. शहरांमध्ये व्यवस्था उभ्या करण्याचा सल्ला दिला. देशाचा 65 टक्के जीडीपी शहरात तयार होतो. वस्तु व सेवांची निर्मिती, रोजगारांची निर्मिती ही शहरात होते. त्यामुळे शहरातील मध्यमवर्गीय व गरिबांचे जीवनमान उंचावेल अशा व्यवस्था निर्माण केल्या तर आपली शहरे हीच पुढच्या काळात विकासाचे केंद्र बनतील. त्यामुळे पंतप्रधान मोदींनी पहिल्यांदा देशात शहराच्या विकासासाठी योजना उभ्या केल्या. त्यासाठी पैसे देणे सुरू केले. त्यातून शहरांना लाखो कोटींचा निधी उपलब्ध होण्यास सुरुवात झाली.


एकट्या महाराष्ट्राला 30 ते 35 हजार कोटी रुपये दिले. त्यातून पिण्याचे पाणी, भुयारी गटार, कचऱ्याचे व्यवस्थापन आदी विविध योजना अंमलात आणल्या गेल्या. यामुळे महाराष्ट्रातील शहरे बदलू लागली, असे फडणवीस म्हणाले.

---



# राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला सेवानिवृत्त

## नायगावात 'गार्ड ऑफ ऑनर'ने मानवंदना, 26/11 चे हिरो सदानंद दाते नवे डीजीपी



दिव्य वतन /वृत्तसंस्था

मुंबई - महाराष्ट्राच्या पहिल्या महिला पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला ३७.५ वर्षांच्या प्रदीर्घ आणि यशस्वी कारकिर्दीनंतर आज सेवानिवृत्त झाल्या. मुंबईतील नायगाव पोलिस मैदानावर आयोजित एका सोहळ्यात त्यांना निवृत्तीनिमित्त 'गार्ड ऑफ ऑनर' देऊन मानवंदना देण्यात आली. १९८८ च्या बॅचच्या आयपीएस अधिकारी असलेल्या शुक्ला यांनी आपल्या कार्यकाळात राज्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखल्याचे समाधान व्यक्त केले. रश्मी शुक्ला यांच्या निवृत्तीनंतर राज्याच्या पोलिस महासंचालकपदाची धुरा आता सदानंद दाते यांच्याकडे सोपवण्यात आली आहे.सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना रश्मी शुक्ला सर्वांचे आभार मानले. "गेली दोन वर्षे महाराष्ट्र पोलिसांचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली, हा माझ्यासाठी मोठा बहुमान आहे. या काळात राज्यातील सण-उत्सव शांततेत पार पडले आणि निवडणुकाही विनाअडथळा पार पडल्या. विशेषतः गडचिरोली आणि गोंदियातील नक्षलग्रस्त भागांत झालेली सुधारणा आणि नक्षलवाद्यांच्या संख्येत झालेली घट, हे संपूर्ण पोलिस दलाचे यश आहे,

फॅशन...

## लालभडक साडीत रिंकू राजगुरुचा मराठमोळा अंदाज



मराठी सिनेसृष्टीतील आघाडीची आणि तरुणाईची लाडकी अभिनेत्री रिंकू राजगुरू पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. यावेळी तिच्या एखाद्या चित्रपटामुळे नव्हे, तर तिच्या लालभडक नऊवारी साडीतील अप्रतिम फोटोशूटमुळे. सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या या फोटोंनी चाहत्यांची मनं अक्षरशः जिंकून घेतली आहेत. पारंपरिक मराठमोळ्या अंदाजात दिसणारी रिंकू सध्या नेटिझन्समध्ये ट्रेंडिंग ठरत आहे. लाल नऊवारी साडी, पारंपरिक दागिन्यांचा साज, कपाळावर कुंकू आणि केसांत माळलेला गजरा या सगळ्यामुळे तिचा लूक अधिकच खुलून दिसतो. साधेपणा आणि आत्मविश्वास यांचा सुंदर मिलाफ तिच्या प्रत्येक फोटोमध्ये जाणवतो. त्यामुळेच चाहत्यांकडून “कोणाची नजर लागू नये”, “खरी मराठमोळी राणी” अशा प्रतिक्रिया येत आहेत. यावेळी तिने अशिष पाटील यांच्यासोबत लावणी सादर केली आहे. या व्हायरल फोटोंमध्ये रिंकूने लाल रंगाची नऊवारी साडी नेसली असून, त्यावर सोनेरी काठ आणि पारंपरिक डिझाइन उठून दिसते. लाल रंग हा सौभाग्य, तेज आणि मराठी संस्कृतीचा प्रतीक मानला जातो. त्याच रंगात रिंकू अधिकच आकर्षक दिसत आहे. साडीची नक्षी, नेसण्याची पारंपरिक पद्धत आणि तिचा आत्मविश्वास यामुळे हा लूक विशेष लक्ष वेधून घेतो. तिचा हा लुक सर्वांनाच खूपच आवडला आहे. या लूकमध्ये रिंकूने पारंपरिक मराठी दागिने परिधान केले आहेत. नथ, ठुशी, कानातले, लाल बांगड्या आणि कंबरपट्टा यामुळे तिचा संपूर्ण अवतार अधिकच उठावदार दिसतो. कपाळावरील लाल कुंकू आणि केसांत माळलेला गजरा तिच्या सौंदर्यात भर घालतो. हा संपूर्ण लूक पाहता, रिंकू एखाद्या पारंपरिक दिसत आहे. आजच्या ग्लॅमरस आणि वेस्टर्न फॅशनच्या युगात, रिंकूसारखी अभिनेत्री मराठी परंपरा, साडी आणि नऊवारी अभिमानाने मिरवत असल्याने अनेकांनी तिचे कौतुक केले आहे. तिचा हा अवतार केवळ सौंदर्यापुरता मर्यादित न राहता, मराठी संस्कृतीचा सन्मान करणारा ठरत आहे. त्यामुळेच अनेक महिला चाहत्यांसाठी ती एक स्टाईल आयकॉन बनली आहे. या लूकमध्ये रिंकू राजगुरूने पारंपरिक मराठमोळी अंबाडा हेअरस्टाईल केली आहे. केस नीट मागे विंचरून मध्यभागी किंवा किंचित खाली अंबाडा बांधण्यात आला असून, त्यावर पांढऱ्या फुलांचा गजरा माळलेला दिसतो. ही हेअरस्टाईल नऊवारी साडीला अतिशय शोभून दिसते आणि चेहऱ्यावरील भाव अधिक उठावदार करते.

हे फोटो समोर येताच सोशल मीडियावर चाहत्यांच्या प्रतिक्रिया अक्षरशः ओसंडून वाहू लागल्या आहेत. “खूपच सुंदर”, “खरी मराठमोळी सौंदर्यवती”, “कोणाची नजर लागू नये”, अशा असंख्य कमेंट्स तिच्या पोस्टखाली पाहायला मिळत आहेत.

## लालभडक साडीत श्वेता शिंदेचा मराठमोळा लुक, ब्लाऊजच्या डिझाईनने वेधले लक्ष



मराठी मनोरंजनसृष्टीत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारी अभिनेत्री श्वेता शिंदे पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. यावेळी कारण आहे तिचा लालभडक रंगातील पारंपरिक पैठणी साडीतील मनमोहक मराठमोळा लुक. साधेपणा, सौंदर्य आणि परंपरेचा सुंदर संगम असलेला हा अवतार पाहून चाहत्यांनी अक्षरशः प्रेमाचा वर्षाव केला आहे. या लुकमध्ये श्वेताने नेसलेली पैठणी साडी पारंपरिक काठ, नाजूक जरकाम आणि रंगीत नक्षीकामामुळे अधिक उठून दिसते. लाल रंगाची भव्यता आणि पैठणीची शाही ओळख यांचा सुंदर मेळ तिच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसा ठरतो. साडीसोबत केलेली पारंपरिक दागिन्यांची निवड नथ, बांगड्या, ठुशी या सगळ्यामुळे तिचा मराठमोळा अंदाज अधिक खुलून आला आहे. श्वेता शिंदेच्या लाल साडीतील लुक पारंपरिक मराठी सौंदर्य आणि आधुनिक स्टाईलचा परफेक्ट संगम. लाल साडीवरील नाजूक ब्लाऊज, थ्री-फोर्थ हातांचे कट, हातांवरील हिरवे चुडे आणि पारंपरिक ज्वेलरी या सर्वांनी एक मोहक आणि उठावदार लूक तयार केला होता. साधा पण उठावदार मेकअप, नैसर्गिक ग्लोसह डोळे आणि हलका ब्लश या सर्व घटकांनी पैठणीतील लुक अधिक आकर्षक आणि लक्षवेधी बनवला होता. या मराठमोळ्या लुकसाठी श्वेता शिंदेचा मेकअप अतिशय साधा पण उठावदार ठेवण्यात आला होता. त्वचेला नैसर्गिक ग्लो मिळावा यासाठी हलका बेस आणि सॉफ्ट फाउंडेशन वापरण्यात आले होते. डोळ्यांसाठी ब्राऊन शेडचा सौम्य आयशॅडो, काजळ आणि आयलाइनरमुळे नजर अधिक बोलकी दिसत होती. भुवया नैसर्गिक ठेवत चेहऱ्याच्या रेषा ठळक होतील असा हलका कंटूर करण्यात आला होता. गालांवर सौम्य ब्लश आणि ओठांसाठी न्यूड ते हलक्या लालसर छटेतील लिपस्टिक वापरण्यात आली होती. कपाळावरील लाल टिकली आणि नाकातील नथ यामुळे संपूर्ण मेकअपला पारंपरिक मराठी सौंदर्याची मोहक जोड मिळाली. श्वेता शिंदेच्या लाल रंगाच्या साडीवर हातातील हिरवा चुडा विशेष लक्ष वेधून घेत होता. या पारंपरिक मराठी लुकमध्ये लाल आणि हिरव्याच्या रंगांचा साधा पण मोहक संगम पाहायला मिळत होता. हिरव्या चुड्यांमुळे हातांचे सौंदर्य अधिक खुलून दिसत होते, तसेच पैठणीच्या लाल रंगाशी हा रंगपूर्ण खूपच सुंदर दिसत होता. श्वेता शिंदेच्या लाल साडीतील ब्लाऊजचे डिझाईनही लक्षवेधी ठरले. साधा पण सुंदर कट आणि थ्री-फोर्थ हाताच्या ब्लाऊजने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. नाजूक कापडावरचे बारकावे आणि हलके नक्षीकाम ब्लाऊजला खास पारंपरिक टच देत होते. या ब्लाऊजमुळे साडीचा लाल रंग अधिक उठून दिसत होता. हातांवरील हिरवे चुडे आणि पारंपरिक ज्वेलरीसह हा ब्लाऊज संपूर्ण लूकमध्ये एक शाही आणि मोहक समतोल साधत होता. श्वेता शिंदेच्या लाल साडीतील लुकवर चाहत्यांचे प्रेम प्रचंड आहे. अनेकांनी कमेंट्समध्ये तिच्या पारंपरिक मराठमोळ्या अंदाजाची स्तुती केली आहे. “अरे वा! किती सुंदर लुक!”, “हिरवे चुडे आणि लाल साडीचा संगम अप्रतिम दिसतो आहे,” असे अनेक उत्साही संदेश पाहायला मिळाले. ब्लाऊजचे डिझाईन, साधा पण उठावदार मेकअप आणि नैसर्गिक ग्लोससह डोळ्यांचे सौंदर्य पाहून चाहते खूप प्रभावित झाले आहेत. साधेपणातली ही मोहकता आणि पारंपरिक अदा चाहत्यांच्या कमेंट्समध्ये कायम लक्षवेधी ठरत आहे.

# 'तुला सांगून काहीही साध्य होणार नव्हतं' सायलीने जाब विचारताच अर्जुनचा चढला पारा, सचिनमुळे नवरा-बायकोमध्ये दुरावा



मुंबई - ' ठरलं तर मग ' मालिकेमध्ये सध्या नवीन ट्विस्ट येताना दिसत आहेत. नागराज आणि प्रियाने स्वतःच्या फायद्यासाठी आणि खोटेपणा समोर येऊ नये म्हणून महिपतला किडनॅप केलेलं असतं. प्रिया, लबाडीनं साक्षीच्या नावाने महिपतला ब्लॅकमेल करते. तर दुसरीकडे सुभेदारांकडे भलताच गोंधळ निर्माण झाला आहे. अस्मिता, सचिनला साक्षीसोबत रंगेहाथ पकडते. सचिनच्या अफेअरबद्दल समजताच संपूर्ण सुभेदार कुटुंब कोलमडतं. अशातच आता सोशल मीडियावर 'ठरलं तर मग' या मालिकेचा प्रोमो शेअर करण्यात आला आहे. प्रोमोमध्ये अर्जुनने सचिनचं सत्य लपवल्यामुळे सायली त्याच्यावर रागावलेली दिसतेय.

अर्जुन दोन दिवसांपूर्वी सचिन आणि साक्षीला एका कॅफेमध्ये एकमेकांना किस करताना बघतो. हे बघून अर्जुनच्या पायाखालची जमीनच सरकते. मात्र, अस्मिताचा आणि तिच्या बाळाचा विचार करून अर्जुन सचिनला सक्त ताकीद देतो. सचिनही पुन्हा असं करणार नाही, कधीच त्या मुलीला भेटणार नाही, असं वचन देतो. पण, अस्मिता आणि कल्पना मार्केटमध्ये असताना सचिन पुन्हा साक्षीसोबत भर रस्त्यात चाळे करताना दिसतो. सचिनच्या या वागण्याचा अस्मिताला खूप त्रास होतो. घरी आल्यानंतर अर्जुन, सचिनला जाब विचारताना म्हणतो, 'मी तुला याआधी ताकीद दिलेली, तरीही तू असं केलंस' त्यावरून अर्जुनने घरातल्यांपासून सचिनचं सत्य लपवल्यामुळे सगळेच त्याच्यावर नाराज होतात. सचिन आणि अस्मिताच्या भांडणाचा परिणाम अर्जुन-सायलीच्या संसारावर होताना दिसतोय.

## नव्या वर्षात संतोष जुवेकरनं चाहत्यांना दिली आनंदाची बातमी



मुंबई - सुप्रसिद्ध मराठी अभिनेता संतोष जुवेकर कायम चर्चेत असतो. अभिनेत्याला अनेकदा ट्रोलही केलं जातं. अशातच आता संतोषने चाहत्यांना आनंदाची बातमी दिली असून याबद्दल अभिनेत्यानं सोशल मीडियावर पोस्ट शेअर केली आहे.अभिनेता संतोष जुवेकरने नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच थार रॉक्स ही नवीन गाडी खरेदी केली आहे. आई-वडील आणि साईबाबांच्या आशीर्वादाने तसेच चाहत्यांच्या प्रेमामुळे आणि शुभेच्छांमुळे ही गाडी घेतल्याचं त्यानं सोशल मीडियावर सांगितलं. या गाडीची किंमत १२.९९ लाख ते २३.०९ लाख रुपयांच्या घरात आहे.

नवीन वर्षाच्या तिसऱ्याच दिवशी संतोष जुवेकरनं चाहत्यांसोबत ही आनंदाची बातमी शेअर केली. त्याच्या घरी थार रॉक्स या गाडीचं आगमन झालं आहे. संतोष जुवेकरनं सोशल मीडियावर 'नवीन वर्षात नवीन गाडी घेतली रे महाराजा!' असं म्हणत गाडीचा व्हिडिओ शेअर केला आहे. अभिनेत्यानं कॅप्शनमध्ये 'देखोना Guysss देखोना आईबाबा आणि साईबाबांच्या आशीर्वादाने याचबरोबर तुम्हा सर्वांच्या प्रेमामुळे आणि शुभेच्छांमुळे या नवीन वर्षात नवीन पेटीपॅक गाडी घेतली महाराजा... आता प्रवासही नव्याने सुरू! चांगभलं! बाप्पा मोरया...' असं लिहीत अभिनेत्यानं आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्याचबरोबर ही पोस्ट शेअर करत Thar Roxx असं हॅशटॅग देखील वापरलं आहे.फायनान्शियल एक्सप्रेसच्या माहितीनुसार, संतोष जुवेकरनं खरेदी केलेल्या या गाडीची किंमत १२.९९ लाख ते २३.०९ लाख रुपयांच्या घरात आहे. इंजिनचा प्रकार पेट्रोल किंवा डिझेल व्हेरिएंट तसंच वेगवेगळ्या शहरांनुसार या किमतीत बदल होतो. संतोष जुवेकरच्या या पोस्टवर चाहत्यांनी तसेच मराठी कलाकारांनी कमेंट्स करत अभिनेत्याचं अभिनंदन केलं आहे.दरम्यान, संतोष जुवेकरच्या कामाबद्दल सांगायचं तर अभिनेता २०२५ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'छावा' चित्रपटामुळे चर्चेत आला होता.

## अंशुमनचा माज काही केल्या जाईना; स्वानंदी करणार दीराचा पर्दाफाश



मुंबई - ' वीण दोघांतली ही तुटेना ' ही मालिका दिवसेंदिवस लोकप्रिय ठरत आहे. या मालिकेमध्ये तेजश्री प्रधान आणि सुबोध भावे यांच्या मुख्य भूमिका आहेत. सध्या या मालिकेमध्ये नवनवीन ट्विस्ट पाहायला मिळत आहेत. स्वानंदीनं तडजोड म्हणून समरसोबत लग्न केलं आहे. समर-स्वानंदीचं लग्न समरची काकी मल्लिकाला मान्य नसतं, त्यामुळे ती काही ना काही कुरघोडी करण्याचा प्रयत्न करते. मल्लिकाला तिचा मुलगा अंशुमनही सामील असतो. अंशुमन समरच्या कंपनीमध्ये घोटाळे करतो. स्वानंदीला अंशुमनवर संशय येतो. ते सिद्ध करण्याचा प्रयत्न करते, मात्र ऐन वेळेस अंशुमन फासे बदलतो. अशातच आता 'झी मराठी'नं सोशल मीडियावर 'वीण दोघांतली ही तुटेना' मालिकेचा प्रोमो शेअर केला असून त्यावर नेटकऱ्यांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत.

'वीण दोघांतली ही तुटेना' मालिकेच्या ३ जानेवारी आणि ४ जानेवारीच्या एपिसोडमध्ये अंशुमनचा खरा चेहरा समर समोर आणण्यासाठी स्वानंदी प्रयत्न करत असते. राजवाडेंच्या ऑफिसमध्ये काम करणाऱ्या मुलीला अंशुमन अश्लील मेसेज पाठवतो. स्वानंदी याबद्दल समरला सांगते. त्या मुलीची बाजू ऐकून घ्या असं स्वानंदी समरला सांगते. स्वतःला वाचवण्यासाठी अंशुमन नवा कट रचतो. समर श्वेताला विचारतो, 'तुला अवघडल्यासारखं होईल, असं अंशुमन वागतोय का? त्याने घाणेरडे मेसेज पाठवले का?' त्यावर श्वेता 'असं काही नाहीये' असं म्हणते आणि स्वानंदीबद्दल खोटं समरला सांगते.

## अभिनेता आशिष विद्यार्थी आणि त्यांची पत्नी रस्ते अपघातात जखमी

### गुवाहाटीच्या झू रोड परिसरात भरधाव दुचाकीने धडक दिली



बॉलिवूड अभिनेता आशिष विद्यार्थी आणि त्यांची पत्नी रुपाली बरुआ शुक्रवारी रात्री उशिरा गुवाहाटीच्या झू रोड परिसरात झालेल्या एका रस्ते अपघातात जखमी झाले. हा अपघात शुक्रवारी रात्री सुमारे 12 वाजता द गुवाहाटी ॲड्रेस हॉटेलसमोर घडला. पोलिसांच्या माहितीनुसार, भरधाव वेगाने येणाऱ्या एव्हेंजर बाईकने रस्ता ओलांडताना दोघांना धडक दिली. ती बाईक चांदमारीच्या दिशेने वेगाने येत होती.धडकेनंतर अभिनेता आणि त्यांच्या पत्नीला दुखापती झाल्या. बाईकस्वारही गंभीर जखमी झाला. माहिती मिळताच गीतानगर पोलीस ठाण्याचे पोलीस घटनास्थळी पोहोचले. जखमी बाईकस्वाराला उपचारासाठी गुवाहाटी मेडिकल कॉलेज रुग्णालयात पाठवण्यात आले. आशिष विद्यार्थी आणि त्यांच्या पत्नीवरही उपचार करण्यात आले.

असे सांगण्यात आले आहे की, पती-पत्नी हॉटेलच्या रेस्टॉरंटमध्ये डिनरनंतर बाहेर पडले होते. त्याचवेळी रस्ता ओलांडताना हा अपघात झाला. आशीष विद्यार्थी यांचे फिल्मी करिअर चार दशकांहून अधिक काळ चालले आहे. त्यांनी 11 हून अधिक भाषांमध्ये 300 हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले आहे. त्यांनी 1986 मध्ये कन्नड चित्रपट 'आनंद' मधून आपल्या करिअरची सुरुवात केली होती. हिंदी सिनेमात त्यांना 1994 च्या 'द्रोहकाल' चित्रपटातून ओळख मिळाली, ज्यासाठी त्यांना 1995 मध्ये राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार मिळाला.आशीष विद्यार्थी यांना त्यांच्या दमदार खलनायक आणि चरित्र भूमिकांसाठी ओळखले जाते. 1942: अ लव्ह स्टोरी, वास्तव, कहो ना... प्यार है, बर्फी! आणि हैदर यांसारख्या चित्रपटांमधील त्यांच्या अभिनयाचे खूप कौतुक झाले. अभिनयाव्यतिरिक्त ते मोटिव्हेशनल स्पीकर आणि लोकप्रिय फूड व ट्रॅव्हल व्लॉगरदेखील आहेत. ते त्यांच्या यूट्यूब चॅनलवर आसाम आणि ईशान्येकडील वेगवेगळ्या भागांचे व्हिडिओ पोस्ट करत असतात.

## 11 वर्षांनंतर पत्नीपासून वेगळा झाला कृप कपूर

### टीव्ही अभिनेत्याने 2014 मध्ये सिमरन कौरशी लग्न केले होते

टीव्हीच्या दुनियेतील हँडसम हंक कृप कपूर सूरी आपल्या अभिनयाने चाहत्यांच्या मनावर राज्य करतो. स्टार प्लसच्या हिट शो 'उडने की आशा' मध्ये ट्रॅफिक पोलिसाची भूमिका साकारून त्याने पुन्हा एकदा चर्चेत स्थान मिळवले. पण आता त्याच्या वैयक्तिक आयुष्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. 11 वर्षांच्या लग्नानंतर कृप आणि त्याची पत्नी सिमरन कौर सूरी वेगळे झाले आहेत. खुद्द अभिनेत्याने याची पुष्टी केली आहे.

सिमरनची सोशल मीडिया पोस्ट व्हायरल होताच घटस्फोटाच्या अफवा पसरल्या. गेल्या वर्षीही दोघे वेगळे राहत असल्याच्या चर्चा होत्या, पण कृपने त्या स्पष्टपणे नाकारल्या होत्या. टेली टॉकशी बोलताना कृपने स्पष्टपणे सांगितले - होय, आम्ही वेगळे झालो आहोत.

सांगायचे झाल्यास, कृप कपूर सूरी आणि सिमरन कौर सूरी यांनी २०१४ मध्ये लग्न केले होते. २०२० मध्ये कृप कपूर सूरी आणि सिमरन कौर सूरी एका मुलीचे पालक झाले होते. पण लग्नाच्या ११ वर्षांनंतर ते दोघे कायदेशीररित्या वेगळे झाले आहेत.

तरीही, २०२४ मध्ये घटस्फोटाच्या अटकळींवर कृप संतापला होता. त्याने सोशल मीडियावर लिहिले होते, "जेव्हा मी काही शेअर करतो, तेव्हा ते दुःख फक्त माझ्या पत्नीपुरतेच का मर्यादित असते? प्रत्येक जोडप्याच्या आयुष्यात चढ-उतार येतात, पण आम्ही एकत्र आहोत." आता हे विधान खोटे ठरले आहे. कृपच्या चाहत्यांना धक्का बसला आहे.

आता प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत की या निर्णयाचा त्यांच्या मुलीच्या भविष्यावर परिणाम होईल का? इंडस्ट्रीमध्ये लग्न तुटणे सामान्य झाले आहे, पण कृपचे हे पाऊल धक्कादायक आहे.



# धुरंधरची प्लॅनिंग कॉपी करणार शाहरुख व भन्साळी

## किंग आणि लव्ह अँड वॉर आता दोन भागांत प्रदर्शित होईल, चित्रपटाच्या यशानंतर निर्णय घेतला

बॉलिवूडचा दमदार स्टार रणवीर सिंगच्या 'धुरंधर' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आहे. याचा पहिला भाग 2025 मध्ये प्रदर्शित झाला आणि सुपरहिट ठरला. आता निर्माते 2026 मध्ये याचा दुसरा भाग प्रदर्शित करण्याच्या तयारीत आहेत. या रणनीतीचे यश पाहून आता शाहरुख खान आणि संजय लीला भन्साळी आपला चित्रपट दोन भागांमध्ये प्रदर्शित करण्याची योजना आखत आहेत.

बॉलिवूड हंगामाच्या रिपोर्टनुसार, शाहरुख खान आणि संजय लीला भन्साळी कॅम्पमध्ये दोन्ही चित्रपटांच्या रिलीज स्ट्रॅटेजीवर गंभीर चर्चा सुरू आहे. शाहरुख खानचा 'किंग' आणि संजय लीला भन्साळींचा 'लव्ह अँड वॉर' हे मेगा बजेट चित्रपट आहेत, ज्यांचा खर्च नियोजनापेक्षा खूप जास्त झाला आहे. 'धुरंधर'च्या जबरदस्त यशाने प्रेरित होऊन दोन्ही निर्माते त्यांचे चित्रपट दोन भागांमध्ये विभागून 6 महिन्यांपेक्षा कमी अंतराने प्रदर्शित करण्याचा विचार करत आहेत.

रिपोर्टमध्ये म्हटले आहे की, भन्साळींचा बहुप्रतिक्षित 'लव्ह अँड वॉर' ऑगस्ट 2026 आणि जानेवारी 2027 मध्ये प्रदर्शित होऊ शकतो. या चित्रपटात आलिया भट्ट, रणबीर कपूर आणि विकी कौशल मुख्य भूमिकेत आहेत. तर, शाहरुख खानचा 'किंग' सप्टेंबर 2026 आणि मार्च 2027 मध्ये मोठ्या पडद्यावर येऊ शकतो. तथापि, ही फक्त सुरुवातीची चर्चा आहे. अद्याप कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही.

सांगायचे झाल्यास, बॉलिवूडमध्ये हा ट्रेंड नवीन नाही. यापूर्वी 'बाहुबली', 'पुष्पा', 'केजीएफ', 'दृश्यम', 'गदर' आणि हृतिक रोशनची सुपरहिरो फ्रँचायझी 'क्रिश' यांसारखे चित्रपट 2-3 भागांमध्ये प्रदर्शित झाले आहेत, परंतु या चित्रपटांच्या प्रदर्शनाच्या तारखांमध्ये खूप फरक होता. 'बॉर्डर 2' प्रजासत्ताक दिनाच्या वीकेंडला 23 जानेवारी 2026 रोजी थिएटरमध्ये प्रदर्शित होईल. हा चित्रपट 1997 च्या ब्लॉकबस्टर 'बॉर्डर' चा सिक्वेल आहे.




## अर्थविश्व...

### 6 महिन्यात पैसे डबल, शेअरमुळे गुंतवणूकदार मालामाल



मुंबई: टायटन बायोटेक लिमिटेड (Titan Biotech Ltd) या कंपनीचे शेअर्स स्प्लिट होणार आहेत. कंपनीने शेअर विभाजनासाठी रेकॉर्ड डेट जाहीर केली आहे. गेल्या केवळ 6 महिन्यांत या कंपनीच्या शेअरच्या किमतीत 100 टक्क्यांहून अधिक म्हणजे दुप्पटीने वाढ झाली आहे. कंपनीने एक्सचेंजला दिलेल्या माहितीनुसार,10 रुपये दर्शनी मूल्य असलेला एक शेअर 5 भागांमध्ये विभागला जाईल. या स्टॉक स्प्लिटनंतर कंपनीच्या शेअरचे दर्शनी मूल्य 10 रुपयांवरून 2 रुपये प्रति शेअर होईल.टायटन बायोटेक लिमिटेड कंपनीने स्टॉक स्प्लिटसाठी 20 फेब्रुवारी 2026 ही तारीख रेकॉर्ड डेट म्हणून निश्चित केली आहे. या दिवशी शेअर बाजारात कंपनीचा एक शेअर पाच भागात विभागला जाणार आहे. या कंपनीचे शेअर्स परताव्याच्या बाबतीत अव्वल आहेत. गेल्या एका महिन्यात या कंपनीच्या शेअर्सच्या किमतीत 10 टक्क्यांची वाढ झाली आहे. तर, मागील सहा महिन्यांत टायटन बायोटेक लिमिटेडच्या शेअर्समध्ये 164 टक्के वाढ नोंदवली गेली आहे. शेअर बाजारातील कामगिरीचा विचार केल्यास, शुक्रवारी कंपनीचे शेअर्स बीएसईमध्ये 1.76 टक्के वाढीनंतर 1081.45 रुपयांच्या पातळीवर बंद झाले होते. कंपनीचा 52 आठवड्यांचा उच्चांक 1419 रुपये आणि 52 आठवड्यांचा नीचांक 373.65 रुपये आहे. कंपनीचे मार्केट कॅप 893 कोटी रुपये आहे. गेल्या दोन वर्षांत टायटन बायोटेक लिमिटेडच्या शेअर्सच्या किमतीत 166 टक्के आणि 5 वर्षांत 617 टक्के वाढ झाली आहे.कंपनी सातत्याने डिव्हिडंड देत आहे. सप्टेंबर महिन्यात कंपनीचे शेअर्स एक्स-डिव्हिडंड ट्रेड झाले होते. त्यावेळी कंपनीने एका शेअरवर दोन रुपये डिव्हिडंड दिला होता. 2024 मध्येही कंपनीने एका शेअरवर दोन रुपये डिव्हिडंड दिला होता. आतापर्यंत कंपनीने पात्र गुंतवणूकदारांना 14 वेळा डिव्हिडंड दिला आहे.


### व्हेनेझुएलावर अमेरिकेचा एअर स्ट्राईक; भारतावर काय परिणाम?



काराकस: अमेरिकेनं व्हेनेझुएलावर हल्ला केला आहे. व्हेनेझुएलाची राजधानी काराकसमध्ये हल्ल्याचे मोठे आवाज ऐकू येत आहेत. काराकसमध्ये किमान सात स्फोट झाले आहेत. शहरावरुन अमेरिकेची लढाऊ विमानं अगदी कमी उंचीवरुव उडत आहेत. त्यांचे आवाज अगदी स्पष्टपणे ऐकू येत आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या हल्ल्यांचे संकेत आधीच दिले होते. अमेरिकन सरकार व्हेनेझुएलाचे अध्यक्ष निकोलस मादुरो यांना हुकूमशहा मानतं. अमेरिकेनं व्हेनेझुएलावर विविध प्रकारेच निर्बंध लादले आहेत. यात खनिज तेलाच्या पुरवठ्याचाही समावेश आहे. अमेरिकेनं व्हेनेझुएलावर केलेल्या हल्ल्याचे परिणाम भारतावरही दिसू शकतात.

भारत आणि व्हेनेझुएला यांच्यात अनेक वस्तूंचा व्यापार होतो. भारत व्हेनेझुएलाकडून खनिज तेल देखील खरेदी करतो. भारतातील मोठ्या तेलशुद्धीकरण कंपन्या व्हेनेझुएलाकडून खनिज तेल खरेदी करतात. यात रिलायन्सची जामनगर येथील तेलशुद्धीकरण प्रकल्पाचा समावेश आहे. याच स्वस्त खनिज तेलापासून पुढे पेट्रोल आणि डिझेलची निर्मिती होते. हा तेल पुरवठा थांबल्यास भारताला दररोज ६ लाख बॅरल तेल मिळणा नाही. या परिस्थितीत भारतीय कंपन्यांना मध्य पूर्व आशिया किंवा कॅनडातून महागडं खनिज तेल खरेदी करावं लागलं.- भारत व्हेनेझुएलाला औषधं , लसी, यंत्रं, सुती कपडे, रसायनं आणि विद्युत उपकरणं विकतो. भारताकडून व्हेनेझुएलाला होणारा औषधांचा पुरवठा मोठा आहे.

### आधुनिक जगाच्या संवाद क्रांतीचे शिल्पकार माहितीच्या महाजालाचा शोध लावला;



आजच्या डिजिटल युगात इंटरनेट आपला श्वास आहे असं म्हटल तरी ती अतिशयोक्ती होणार नाही. माहिती, शिक्षण, व्यापार, संवाद, करमणूक अशा प्रत्येक क्षेत्रात इंटरनेटने क्रांती घडवली आहे. वेबसीट्स, फेसबुक, गुगल, इनस्टाग्राम, व्हॉटसॲप, ई-मेल, ऑनलाइन शॉपिंग यांनी आपले सारे जीवन व्यापून टाकले आहे. पण हे सर्व शक्य झाले ते आहे एका व्यक्तीमुळे, ती म्हणजे इंग्लंडचे सर टिम बर्नर्स-ली.

8 जून 1955 रोजी लंडनमध्ये जन्मलेल्या टिम यांना विज्ञानाचा वारसा घरातूनच मिळाला होता. त्यांचे आई-वडील हे दोघेही गणितज्ञ होते आणि त्यांनी जगातील पहिल्या व्यावसायिक संगणकांपैकी एक असलेल्या 'फेरांटी मार्क 1' प्रकल्पावर काम केले होते. टिम यांना लहानपणापासूनच इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणकाची आवड निर्माण झाली.

बर्नर्स-ली यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठामधून 1976 मध्ये भौतिकशास्त्रात प्रथम श्रेणीत पदवी प्राप्त केली. 1980 मध्ये ते स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथील युरोपियन अणुसंशोधन संस्थेत (सर्न) सॉफ्टवेअर अभियंता म्हणून रुजू झाले. सर्नमध्ये काम करताना त्यांना संशोधकांना माहिती शेअर करण्यात येणाऱ्या अडचणी जाणवल्या. तेथे जगभरातील शास्त्रज्ञ विविध प्रणाली वापरत असल्यामुळे वेगवेगळ्या संगणकांवरची माहिती एकत्रितपणे वापरणे कठीण होते. ही अडचण दूर करण्यासाठी त्यांनी एका नव्या प्रणालीची संकल्पना मांडली - ज्यामध्ये 'हायपरटेक्स्ट'च्या माध्यमातून संगणकांमधील माहिती एकमेकांशी जोडता येईल. याच कल्पनेतून वर्ल्ड वाइड वेबचा जन्म झाला.

बर्नर्स-लीने 1990 मध्ये पहिला वेब सर्व्हर बनवला आणि 1991 साली जगातील पहिली वेबसाइट 'info.cern.ch' जगासमोर सादर केली. या वेबसाइटद्वारे वेब म्हणजे काय, ते कसे वापरायचे आणि कसे विकसित करायचे याची माहिती देण्यात आली होती. याद्वारे माहितीची देवाणघेवाण वेगवान व सोपी झाली आणि जगभरातील लोकांना ज्ञानाची दारे खुली झाली. बर्नर्स-ली यांची थोरवी अशी की त्यांनी या क्रांतिकारी शोधाचे पेटंट घेतले नाही. त्यांना हवे असते तर ते जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती होऊ शकले असते, पण त्यांना 'वेब' हे सर्वांसाठी मुक्त आणि मोफत ठेवायचे होते. म्हणूनच हा शोध पेटंटशिवाय संपूर्ण जगासाठी मोफत खुला केला. त्यांच्या या निर्णयामुळेच आज इंटरनेटचा विस्तार झपाट्याने झाला आहे.

# वैभव सूर्यवंशीच्या नेतृत्वाखाली भारताचा दमदार विजय,



नवी दिल्ली : वैभव सूर्यवंशीच्या नेतृत्वामध्ये भारताने दक्षिण आफ्रिकेच्या संघावर दमदार विजय साकारला. भारताचा हा या दौऱ्यीतल पहिलाच सामना होता. या पहिल्या सामन्यात भारताने किती धावांनी विजय साकारला, हे आता समोर आलं आहे.

भारताने या सामन्यात टॉस जिंकला आणि कर्णधार वैभव सूर्यवंशीने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. वैभव सूर्यवंशी भन्नाट फॉर्मात गेले काही दिवस होता. पण या सामन्यात मात्र त्याला चमक दाखवता आली नाही. भारताला पहिला धक्का आरोन जॉर्जच्या रुपात बसला, त्याला पाच धावा करता आल्या. वैभवकडून यावेळी मोठी अपेक्षा होती. पण वैबवला या सामन्यात ११ धावांवरच समाधान मानावे लागले. भारताचे एकामागून एक विकेट पडत गेले आणि त्यांनी ४ बाद ६७ अशी अवस्था झाली होती. यावेळी भारताचा संघ गडगडेल, असे वाटत होते. पण त्यावेळी भारताच्या मदतीसाठी हरवंश पांगलिया आणि आरएस अंब्रिश हे दोघे धावून आले. या दौघांनी पाचव्या विकेटसाठी १३७ धावांची भागीदारी रचली आणि संघाला दोनशे धावांचा महत्वाचा टप्पा गाढून दिला.

हरवंशने यावेळी धमाकेदाज फटकेबाजी करत आपले अर्धशतक पूर्ण केले.हरवंश त्यानतर शतकाच्या दिशेने कूच करायला लागला, पण शतक पूर्ण करण्यात त्याला अपयश आले. हरवंशने या सामन्यात सात चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर ९३ धावा केल्या, त्याचे शतक सात धावांनी हुकले. हरवंशला यावेळी अंब्रिशने चांगली साथ दिली, त्याने सात चौकारांच्या जोरावर ६५ धावा केल्या. अखेरच्या षटकांमध्ये खिलान पटेलने १२ चेंडूंत तीन षटकारांच्या जोरावर २६ धावा केल्या, त्यामुळे भारताला या सामन्यात तिनशे धावांचा पल्ला गाठता आला. भारताने या सामन्यात ३०१ धावांचा डोंगर उभारला.

भारताच्या ३०२ धावांचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेची सुरुवात चांगली झाली नाही. कारण त्यांची ३ बाद ६२ अशी अवस्था झाली होती. यजमानांचा सलामीवीर जोरिच व्हॅनने नाबाद ६० धावा केल्या होत्या. दक्षिण आफ्रिकेची २७.४ षटकांत ४ बाद १४८ अशी धावसंख्या असताना पावसाचे आगमन झाले. पावसाचा जोर एवढा होता की, या सामन्याचा डकवर्थ लुईस नियमांनुसार निकाल लावण्यात आला. भारताने हा सामना २५ धावांनी जिंकल्याचा निकाल देण्यात आला.

## हार्दिक पंड्याने 133 धावा करूनही त्याला संघाबाहेर का ठेवलं

नवी दिल्ली : हार्दिक पंड्या हा भन्नट फॉर्मात आहे. त्यामुळे त्याला भारताच्या वनडे संघात स्थान मिळेल, असे सर्वांनाच वाटत होते. पण जेव्हा भारताचा संघ जाहीर करण्यात आला, तेव्हा त्यामध्ये हार्दिक पंड्याचे नाव नव्हते आणि त्यामुळेच सर्वांना मोठा धक्का बसला. पण हार्दिक पंड्याला भारताच्या वनडे संघात संधी का देण्यात आली नाही, याचे एकमेव कारण आता बीसीसीआयने दिले आहे.

हार्दिक पंड्याने शनिवारी विजय बझारे ट्रॉफीमध्ये धडाकेबाज फटकेबाजी केली. हार्दिक पंड्याचया बडोद्याच्या संघाचा सामना यावेळी विदर्भाच्या संघाबरोबर होता. या सामन्यात हार्दिक पंड्याने फक्त एका षटकात ३४ धावांचा पाऊस पाडल्याचे पाहायला मिळाले. हार्दिकने या षटकात पाच षटकार आणि एक चौकार लगावला होता. हार्दिक फक्त एवढ्यावर थांबला नाही, तर त्याने यावेळी आपले शतकही पूर्ण केले. हार्दिकने या सामन्यात फक्त ९२ चेंडूंत ८ चौकार आणि ११ षटकारांच्या जोरावर १३३ च्या स्ट्राइक रेटने १३३ धावांची तुफानी खेळी साकारली. हार्दिकच्या या शतकामुळेच बडोद्याच्या संघाला मोठी धावसंख्या उभारता आली. भारताच्या संघाची निवड होण्यापूर्वीच हार्दिकने आपले शतक साजरे केले होते. पण तरीही त्याला भारताच्या संघात संधी का मिळाली नाही, हे आता बीसीसीआयने सांगितले आहे.

हार्दिकबाबत बीसीसीआयने म्हटले आहे की, " हार्दिक पंड्या एक महत्वाचा खेळाडू आहे. पण त्याचबरोबर त्याचा फिटनेस आणि वर्कलोड मॅनेजमेंट हे पाहावे लागते. हार्दिक पंड्या हा १० षटके टाकू शकतो, एवढा फिटनेस त्याच्याकडे नसल्याचे बीसीसीआयला वाटत आहे. कारण अकादमीत त्याची फिटनेस टेस्ट झाली आणि तो १० षटके गोलंदजी करेल, असे आम्हाला वाटत नाही. त्यामुळे हार्दिकला या वनडे संघात संधी देण्यात आलेली नाही. "

हार्दिक हा सध्याच्या घडीला भन्नाट फॉर्मात आहे. गेल्या टी २० सामन्यात त्याने जलद शतकही झळकावले होते. त्यामुळे भारताला हा सामना सहजपणे जिंकता आला होता. आज, शनिवारीही संघाची निवड होण्यापूर्वी हार्दिकने शतक झळकावले, पण तरीही त्याची निवड भारताच्या वनडे संघात होऊ शकली नाही.



## बांगलादेशच्या रेहमानला IPL 2026 मध्ये खेळवायचं की नाही, KKR ने कोणता निर्णय घेतला,

कोलकाता : बांगलादेशमध्ये हिंदूवर अत्याचार केले जात आहेत. बांगलादेशमध्ये निष्पाप हिंदूवर हल्ले होत आहेत, या परिस्थितीत बांगलादेशबाबत भारतीयांच्या मनात राग आहे. पण बांगलादेशच्या खेळाडूंना भारतात खेळायला द्यायचं की नाही, हा मोठा प्रश्न होता. आज KKR च्या संघाने अखेर बांगलादेशचा मिस्ताफिझूर रेहमान आयपीएल खेळू शकतो का नाही, याबाबत मोठा निर्णय घेतला आहे.

बांगलादेशमध्ये हिंदूवर जो अन्याय केला जात आहे, त्याचे व्हिडिओ जगभरात व्हायरल होत आहेत. भारतामध्ये हे व्हिडिओ पाहून रोष व्यक्त केला जात आहे. त्यामुळे बांगलादेशच्या खेळाडूंना भारतात पाऊल ठेवायला देऊ नये, असे भारतीयांचे मत होते. पण बीसीसीआयने शुक्रवारी मात्र मिस्ताफिझूर रेहमान आयपीएल खेळू शकतो, अशी भूमिका घेतला होती. केकेआरच्या संघाने आयपीएलच्या लिलावात तब्बल ९ कोटी २० लाख रुपये किंमत मोजत रेहमानला आपल्या ताफ्यात सामील करून घेतले होते. पण केकेआरच्या संघाने मात्र याबाबत एकही शब्द उच्चारला नव्हता. पण आता केकेआरच्या संघाने मिस्ताफिझूर रेहमानबाबतचा निर्णय घेतला आहे. शनिवारी केकेआरच्या संघाने याबाबतची आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

केकेआरने शनिवारी एक पत्रक काढले आणि या पत्रकात त्यांनी म्हटले आहे की, " केकेआर तुम्हाला सांगू इच्छिते की, आयपीएलच्या आगामी म्हणजेच २०२६ च्या हंगामासाठी आम्ही मिस्ताफिझूर रेहमानला संघामधून रिलीज करत आहोत. त्यामुळे तो आयपीएल २०२६ च्या मोसमासाठी केकेआरच्या संघात नसेल. " केकेआरने यावेळी सांगितले आहे की, बांगलादेशचा मिस्ताफिझूर रेहमान हा २०२६ साली त्यांच्या संघाकडून खेळणार नाही, पण त्यानंतर मात्र तो त्यांच्या संघाकडून खेळू शकतो, असाही याचा अर्थ निघतो. त्यामुळे आता बीसीसीआयने जर बांगलादेशच्या खेळाडूंवर पाकिस्तानसारखी बंदी घातली तरच हा प्रश्न कायमचा निकाली लागू शकतो.



केकोरने मिस्ताफिझूर रेहमानबाबत आपली भूमिका घेतलेली आहे. केकेआरने एक पत्रक काढत लिलावात नऊ कोटीपेक्षा जास्त बोली लावलेल्या खेळाडूबाबत आपला निर्णय जाहीर केला आहे. पण हा निर्णय जाहीर करताना त्यांनी एक गोष्ट अस्पष्ट ठेवली आहे.


## मैदानात उतरताच हार्दिकचं तुफान, धुरंदर खेळी खेळत शतकं

राजकोट: विजय हजारे ट्रॉफीचा थरार सध्या सुरु आहे. विजय हजारेमध्ये दमदार कामगिरी करुन काही खेळाडूंना संघात कमबॅक करण्याची संधी असणार आहे. भारत आणि न्यूझीलंड विरुद्ध एकदिवसीय मालिकेसाठी संघ जाहीर होणार आहे. यामुळे बीसीसीआयची नजर Vijay Hazare Trophy 2025-26 खेळाडूंची कामगिरीवरही असणार आहे. आता संघ जाहीर होण्यापूर्वी Hardik Pandya काय पराक्रम केला ते पाहा...

शनिवारी बडोद्यासाठी खेळताना हार्दिक पंड्याने विदर्भाविरुद्ध धमाकेदार शतक झळकावले. या सामन्यात हार्दिकचे शतक हे एक उल्लेखनीय कामगिरी होती. हार्दिकच्या शतकामुळे बडोद्याने 50 षटकांत नऊ बाद 293 धावा केल्या. बडोद्याचा दुसरा कोणताही खेळाडू अर्धशतक झळकावू शकला नाही. तो एका टोकावर उभा राहिला आणि विदर्भाच्या गोलंदाजांना अडचणीत आणले.

या सामन्यात पंड्याने 68 चेंडूत शतक झळकावले, ज्यामुळे त्याच्या संघाला एक भक्कम धावसंख्या मिळाली. त्याने 92 चेंडूंचा सामना केला आणि 133 धावा केल्या, त्यात आठ चौकार आणि 11 षटकार मारले. त्याचा स्ट्राईक रेट 144.57 होता. विष्णू सोलंकी हा संघाचा दुसरा सर्वाधिक धावा करणारा गोलंदाज होता, त्याने 26 धावा केल्या. यश ठाकूरने पंड्याला बाद करत विदर्भाकडून चार बळी घेतले. नचिकेत भुते आणि पार्थ रेखाडे यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले.

हार्दिकने 62 चेंडूत 66 धावा केल्या. त्यानंतर 39 व्या षटकात त्याने पाच षटकार आणि एक चौकार मारत आपले शतक पूर्ण केले. एकाच षटकात पंड्याने खेळ पूर्णपणे बदलून टाकला. पंड्याला न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेतून विश्रांती दिली जाऊ शकते. टी-20 विश्वचषक लक्षात घेऊन बीसीसीआय त्याला विश्रांती देऊ शकते. पंड्याने जास्त एकदिवसीय सामने खेळलेले नाहीत आणि विजय हजारे ट्रॉफीमध्ये त्याने पुरेशी गोलंदाजी केलेली नाही. त्यामुळे निवडकर्ते त्याला एकदिवसीय मालिकेतून विश्रांती देऊ शकतात. आता संघ जाहीर होणार असून संघात कोणाला जागा मिळते हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.



# BCCI वर 24 तासांत झुकण्याची नामुष्की..

## भारताच्या बांगलदेश दौऱ्याबाबत घेतला सर्वात मोठा निर्णय

नवी दिल्ली : बीसीसीआयसारख्या सर्वात धनाढ्य संस्थेला अखेर फक्त २४ तासांत झुकावं लागलं आहे. बीसीसीआयने बांगलादेशच्या दौऱ्याबाबत एक निर्णय शुक्रवारी घेतला होता. पण या निर्णयाला २४ तासही उलटून जात नाहीत, तेवढ्यातच बीसीसीआयला झुकावं लागलं आहे आणि त्यांनी आता एक मोठी निर्णय घेतला आहे.

बांगलादेशमध्ये निष्पाप हिंदूवर अत्याचार केला जात आहे. हिंदूर जीवघेणे हल्ले होत आहे, ज्यामध्ये काही जणांना आपला जीवही गमवावा लागला आहे. हे सर्व होत असताना बांगलादेशच्या खेळाडूंना भारतात खेळण्याची परवानगी द्यायची का, असा प्रश्न बीसीसीायला विचारण्यात आला होता. यावर बीसीसीआयने जे भारत सरकार निर्णय घेईल, ते आम्हाला मान्य असेल, असे म्हटले होते. पण बीसीसीआयने अखेर आपला निर्णय स्पष्टपणे सांगितला नव्हता.

बांगलादेशविरोधात भारतामध्ये संतापाची लाट उसळत असताना मात्र बीसीसीआयने एक निर्णय घेतला होता. बीसीसीआयने यावेळी भारत आणि बांगलादेश यांच्या सामने होतील, असे जाहीर करून टाकलं. भारत बांगलादेशच्या दौऱ्यावर जाणार असल्याचे बीसीसीआयने सांगितले होते. या दौऱ्यात भारतीय संघ वनडे आणि टी २० सामने खेळतील, असेही बीसीसीआयने स्पष्ट केले होते. बीसीसीआय फक्त एवढ्यावर थांबली नाही तर हे सामने कधी आणि कुठे होतील, हेदेखील बीसीसीआय सांगून मोकळी झाली होती. दुसरीकडे बांगलादेशच्या क्रिकेट मंडळाने हा दौरा होत असल्याचे जगभरात गाजावा करत सांगितले होते. पण अखेर बीसीसीआयला चाहत्यांच्या रागापुढे नमते घ्यावे लागल्याचे पाहायला मिळाले आहे. कारण बीसीसीआयने




आता जाहीर केले की, आम्ही भारताचा बांगलादेशचा दौरा हा होल्डवर ठेवत आहोत. जोपर्यंत भारत सरकार आम्हाला सूचना करत नाही तोपर्यंत हा दौरा होऊ शकणार नाही. त्यामुळे सध्याच्या घडीला तरी हा दौरा तुर्तास पुढे ढकलला जाऊ शकतो किंवा रद्द होऊ शकतो, हा महत्वाचा निर्णय भारत सरकारवर अवलंबून असणार आहे.





## महत्त्वाचे...

### 2 लाखांपर्यंतच्या पीक कर्जावरील मुद्रांक शुल्क माफ- चंद्रशेखर बावनकुळे



मुंबई -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्य सरकारने बँकेकडून पीक कर्ज घेताना लागणारे तारण शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय 1 जानेवारी 2026 पासून लागू होणार आहे. त्याचा राज्यातील हजारो शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. विशेष म्हणजे यासंबंधीचे अधिकृत राजपत्रही जारी झाले आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी या निर्णयाची घोषणा करत शेतकऱ्यांना गुड न्यूज दिली. ते म्हणाले, दोन लाख रुपयांपर्यंतच्या सर्व शेती व पीक कर्ज व्यवहारांवरील मुद्रांक शुल्क 1 जानेवारी 2026 पासून पूर्णतः माफ करण्यात येणार आहे. या निर्णयाबाबतचा अधिकृत आदेश महसूल व वन विभागाकडून जारी करण्यात आला आहे. शेती हा अत्यंत जोखमीचा व्यवसाय आहे. वातावरणात होणाऱ्या सतत बदलांचा शेतीवर थेट परिणाम होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागतो. या परिस्थितीत पीक कर्ज हेच शेतऱ्यांसाठी उपयुक्त ठरते.पण कर्ज घेताना होणारा अतिरिक्त खर्च शेतकऱ्यांच्या अडचणी वाढवत होता. हे लक्षात घेऊन सरकारने मुद्रांक शुल्क माफीचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम 1958 च्या कलम 9 च्या खंड (अ) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून लोकहितास्तव पुढील कार्यवाही करणे आवश्यक असल्याचे खात्री पट असल्याचे हा निर्णय घेण्यात आला.

### फुले, शाहू, आंबेडकरांचे नाव घेणारे गुंडांना तिकीट देतात-लक्ष्मण हाके



मुंबई -ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी पुणे महापालिका निवडणुकीत गुंडांना तिकीट देण्याच्या मुद्यावरून सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर सडकून टीका केली आहे. फुले, शाहू व आंबेडकरांचे नाव घेणारे आज बोडके व आंदेकरांसारख्या गुंडांच्या कुटुंबीयांना तिकीट देतात, असे ते म्हणालेत. पवारांचे दात तोंडात नाहीत, तर पोटात आहेत, असेही ते यावेळी बोलताना म्हणाले.राष्ट्रवादी काँग्रेसने पुणे महापालिका निवडणुकीत कुख्यात गुंड गजा मारणे याची पत्नी जयश्री मारणे यांना उमेदवारी दिली आहे. त्यांनी पक्षाच्या एबी फॉर्मवर आपला उमेदवारी अर्ज भरला आहे. गजा मारणे सध्या तुरुंगात आहे. तो आपल्या काळ्या कारवायांप्रकरणी कुख्यात आहे. एवढेच नाही तर राष्ट्रवादी कुख्यात गुंड बापू नायर याच्या पत्नीलाही उमेदवारी दिली आहे. याशिवाय आयुष कोमकर हत्याकांडातील आरोपी कुख्यात गुंड बंडू आंदेकर याची भावजय लक्ष्मी आंदेकर व सून सोनाली आंदेकर यांनाही राष्ट्रवादीने उमेदवारी दिली आहे. पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीने ह्या उमेदवारी दिल्यामुळे अजित पवारांवर टीकेची झोड उठली आहे. या पार्श्वभूमीवर लक्ष्मण हाके यांनी अजित पवारांवर टीकेची झोड उठवली आहे. ते क्रांतीज्योति सावित्रीबाई फुले यांच्या 195 व्या जयंतीनिमित्त पत्रकारांशी बोलताना म्हणाले, अजित पवार सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेपुढे नतमस्तक होतात. फुले, शाहू, आंबेडकरांचे नाव घेतात. पण दुसरीकडे, उमेदवारी देताना बोडके, आंदेकर, नायर यांच्यासारख्या गुंडांच्या कुटुंबीयांना तिकीट देतात. हीच त्यांची रणनीती आहे. गुंड, मवाली, पैसेवाले, मनी-मसल पॉवर व बोगस दाखले असलेल्यांनाच तिकीट दिले जात आहे. यामुळे लोकशाहीची ऐशी की तैशी झाली आहे.

# भाजप प्रदेशाध्यक्षांचा अजित पवारांना थेट इशारा

## तुम्ही नरेंद्र मोदी अन् देवेंद्र फडणवीस यांच्या पक्षावर आरोप करत आहात हे लक्षात ठेवा!

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई-सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांनी भाजपवर भ्रष्टाचाराचे केलेले आरोप भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या चांगलेच जिव्हारी लागलेत. त्यांनी आज पत्रकारांशी संवाद साधताना थेट अजित पवारांनाच निर्वाणीचा इशारा दिला. अजित पवार पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पक्षाविषयी बोलत आहेत हे त्यांनी लक्षात घ्यावे, असे ते म्हणालेत. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही या प्रकरणी अजित पवारांना मनभेद किंवा मतभेद निर्माण होतील असे विधान टाळण्याचा सल्ला दिला आहे.पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत भाजप विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस असा सामना रंगला आहे. अजित पवारांनी शुक्रवारी या प्रकरणी पत्रकारांशी संवाद साधताना भाजपवर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. भाजपने मागच्या 7 वर्षांत महापालिका अक्षरशः लुटून खाल्ली. या लुटारुंना रोखण्यासाठी आम्ही एकत्र आलोत, असे ते म्हणाले होते. एवढेच नाही तर ज्या लोकांनी माझ्यावर 70 हजार कोटींच्या भ्रष्टाचाराचे आरोप केले, त्या सर्वांसोबत मी आज सरकारमध्ये बसलो असल्याचेही त्यांनी यावेळी पत्रकारांचे लक्ष वेधले होते. त्यांच्या या विधानाचा आज भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी समाचार घेतला.

रवींद्र चव्हाण म्हणाले, अजित पवारांनी सर्वप्रथम स्वतःच्या पक्षाकडे पाहिले पाहिजे. ते पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पक्षाविषयी बोलत आहेत हे त्यांनी लक्षात ठेवावे. प्रत्यक्षात आरोप - प्रत्यारोप कसे करावेत हे त्यांनी ठरवले पाहिजे. आम्ही कधी आरोप करायला गेलो तर त्यांना फार अडचणी निर्माण होतील. त्यामुळे त्यांनी त्याची काळजी घेतली पाहिजे. अजित पवारांना राजकारणाचा दीर्घ अनुभव असल्याने त्यांनी केवळ आरोप न करता संबंधित यंत्रणांकडे रीतसर तक्रार करावी पुण्याची निवडणूक ही पुणेकरांच्या नागरी समस्या सोडवण्याच्या मुद्यावर होत आहे. पुणेकरांना चांगल्या सुविधा कोण देऊ शकते यावर ही निवडणूक होत आहे. त्यांना या सुविधा भाजपच देऊ शकते.रवींद्र चव्हाण पुढे म्हणाले, नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकार व देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील राज्यातील महायुती सरकार हे गतिमान सरकार नेमके कसे असावे याचे उत्कृष्ट उदाहरण घालून देत आहे. पुणेकरांना याची प्रचिती येत आहे. कारण, पुण्यातही हे सरकार गतिमान पद्धतीने काम करत आहे.



पायाभूत प्रकल्पांची कामे वेगाने केली जात आहेत. त्यासाठी कोट्यवधी रुपये दिले जात आहेत. पुणे महापालिकेच्या स्थापनेपासूनचे स्वप्न साकार करायचे असेल तर त्या दिशेने पाऊले उचलणे आवश्यक आहे. पुणे महापालिकेत मेट्रोचा ठराव झाला होता. पण राज्यात सत्ता असतानाही महाविकास आघाडीला पुण्यात मेट्रो सुरू करता आली नाही. त्यांना ती करायचीच नव्हती. त्यांनी काहीच केले नाही. याऊलट केंद्रात मोदींचे सरकार आल्यानंतर पुण्यात मेट्रो सुरू झाली. सध्या शहरात 33 किलोमीटरचे मेट्रोचे जाळे तयार झाले आहे, असे रवींद्र चव्हाण म्हणाले.दुसरीकडे, राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही या प्रकरणी अजित पवारांवर निशाणा साधला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत एकमेकांविरोधात निवडणूक लढवताना मनभेद किंवा मतभेद होणार नाहीत याची काळजी तिन्ही पक्षांनी घ्यावी असे देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे व अजित पवार यांनी ठरवले आहे. त्यानुसार मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणात कोणत्याही पक्षावर किंवा कोणत्याही नेत्यावर अद्याप टीका केली नाही.

## भाजप उमेदवाराला 2 दिवसांची, तर तीन आरोपींना 4 दिवसांची पोलिस कोठडी

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

सोलापूर- महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत एका भीषण हत्याकांडाने संपूर्ण शहर सुन्न झाले आहे. मनसे विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी बाळासाहेब सरवदे यांच्या हत्येप्रकरणी भाजपच्या उमेदवार शालन शिंदे यांना दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. महापालिका निवडणुकीच्या इतिहासात एखाद्या अधिकृत उमेदवाराला हत्येच्या गुन्ह्यात पोलिस कोठडी मिळण्याची ही पहिलीच वेळ असून, या घटनेमुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.सोलापुरातील जोशी गल्ली येथे शुक्रवारी उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या कारणावरून भाजपच्या दोन गटांत जोरदार वाद झाला. भाजपच्या अधिकृत उमेदवार शालन शिंदे आणि



बंडखोर उमेदवार रेखा सरवदे यांच्या कुटुंबात हा संघर्ष झाला. या वादाचे पर्यावसान हत्येत झाले असून, यात बाळासाहेब सरवदे यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी अटकेत असलेल्या भाजप उमेदवार शालन शिंदे यांना 2 दिवसांची, तर आतिश शिंदे, अमर शिंदे आणि तानाजी शिंदे या तीन आरोपींना 4 दिवसांची पोलिस कोठडी प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी श्रीमती एम. पी. मर्ढेकर यांनी सुनावली आहे.

मयत बाळासाहेब यांचे बंधू बाजीराव सरवदे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ही घटना अत्यंत क्रूरपणे घडवण्यात आली. तक्रारीत नमूद केल्यानुसार, भाजप उमेदवार शालन शिंदे यांनी बाळासाहेब यांच्या डोळ्यात चटणी टाकली आणि त्यानंतर इतर आरोपींनी त्यांच्यावर धारदार शस्त्राने भीषण वार केले.

## 5 राज्यांत निवडणुका, 3 मध्ये भाजप कधीच जिंकली नाही या वर्षी देशातील 17% लोकसंख्या नवीन सरकारे निवडणार

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

या वर्षी देशातील 5 राज्यांमध्ये निवडणुका होणार आहेत, जिथे देशातील 17% लोकसंख्या स्वतःसाठी नवीन सरकार निवडेल. पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि केरळमध्ये भाजपला कधीही निवडणूक जिंकता आलेली नाही. तर, आसाममध्ये तिसऱ्यांदा आणि पुद्दुचेरीमध्ये दुसऱ्यांदा सत्तेत येण्याचा प्रयत्न करत आहे. बांगलादेश, नेपाळसह जगातील 36 देशांमध्येही सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. 2 वर्षांहून अधिक काळ पॅलेस्टाईन-गाझा युद्धात अडकलेले इस्रायलचे पंतप्रधान नेतन्याहू यांचे भवितव्यही या वर्षी ठरेल.14 वर्षांपासून मुख्यमंत्री ममता बॅनर्जीसमोर भाजप हे मुख्य आव्हान आहे. 2026 च्या निवडणुकीत टीएमसी जिंकल्यास, ममता बॅनर्जी सलग चौथ्यांदा




मुख्यमंत्री बनून विक्रम करतील. असे करणारी त्या देशातील पहिल्या महिला असतील. यापूर्वी जयललिता यांच्या नावावर 5 वेळा तामिळनाडूच्या मुख्यमंत्री बनण्याचा विक्रम आहे. पण त्या 1991 ते 2016 पर्यंत वेगवेगळ्या कार्यकाळात (सलग नाही) मुख्यमंत्री पदावर होत्या.

आसाममध्ये 10 वर्षांपासून भाजपचे सरकार आहे. पक्ष तिसऱ्या निवडणुकीच्या तयारीला लागला आहे. पंतप्रधान मोदींनी 6 महिन्यांत 3 वेळा राज्याचा दौरा केला आहे. येथे पक्षाने 126 जागांपैकी 100+ जागा जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे. आसाममध्ये बांगलादेश, घुसखोर/सीमा सुरक्षा, आसामी ओळख यांसारखे मुद्दे आहेत. भाजपला रोखण्यासाठी काँग्रेसने 10 पक्षांसोबत युती केली आहे. यात डावे आणि प्रादेशिक पक्ष समाविष्ट आहेत.

तमिळनाडू हे एकमेव असे राज्य आहे जिथे गेल्या 60 वर्षांपासून भाजप किंवा काँग्रेसचे सरकार स्थापन झालेले नाही. भाजप जयललितांच्या AIADMK पक्षासोबत युती करू शकते. इकडे सुपरस्टार विजय यांचा TVK पक्षही मैदानात आहे.

केरळ हे देशातील एकमेव राज्य आहे, जिथे अजूनही डावे सत्तेत आहेत. येथे सत्ता बदलण्याची परंपरा राहिली आहे, परंतु 2021 मध्ये डाव्या आघाडीने (LDF) हा ट्रेंड मोडून सलग दुसऱ्यांदा सरकार स्थापन केले. काँग्रेस आघाडीचा प्रयत्न यावेळी सत्ताविरोधी लाटेचा फायदा घेण्याचा असेल.तर, भाजपने आतापर्यंत केरळमध्ये एकही विधानसभा जागा जिंकलेली नाही. गेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी येथे त्रिशूर लोकसभा जागा जिंकली होती.

## BMC निवडणूक 2026- पक्ष नाही नगरसेवकाचे काम मोठा घटक सर्वेक्षणात 50% महिलांचा भाजप-शिवसेनेला पाठिंबा

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई-बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) निवडणुकीत मतदारांसाठी नगरसेवकाचा चेहरा, पक्ष, जात-धर्म यापेक्षा त्यांच्या कामाच्या आधारावर मतदान करतील. 40%-54% पर्यंत लोकांनी त्यांच्या मतानुसार नगरसेवकाच्या कामालाच सर्वात महत्त्वाचा घटक सांगितले आहे.विधानसभा निवडणुकीच्या ट्रेंडनुसारच BMC निवडणुकीतही महिलांचा 50% पाठिंबा भाजप-शिवसेना (शिंदे) युतीला मिळू शकतो. तर, मराठी माणसाचा शिवसेना (UBT)-मनसेला 44% आणि भाजप-शिवसेना (शिंदे) युतीला 42% पाठिंबा दिसत आहे. म्हणजेच मराठी मतही एकतर्फी ठाकरे बंधूंच्या बाजूने नाही.

दुसरीकडे मुस्लिम मतदार INC+ सोबत सर्वाधिक 41% दिसत आहेत. गुजराती, उत्तर आणि दक्षिण भारतीय समुदायात भाजप-शिवसेना (शिंदे) युतीला 53% पाठिंबा मिळू शकतो. तथापि, अजूनही 60 टक्के लोकांनी मतदान करण्याचा निर्णय घेतलेला नाही.हे सर्व आकडे Ascendia Strategies LLP द्वारे केलेल्या सर्वेक्षणात समोर आले आहेत. हे सर्वेक्षण 17 ते 24 डिसेंबर 2025 दरम्यान करण्यात आले, ज्यात विविध वयोगटातील आणि सामाजिक गटांतील 1000 हून अधिक लोकांची मते घेण्यात आली.सर्वेक्षणात धक्कादायक बाब समोर आली की, सुमारे 50 टक्के लोकांनी कधीही आपल्या नगरसेवकाशी कोणतीही तक्रार



किंवा कामासाठी संपर्क साधला नाही. तरुणांमध्ये संपर्क साधण्याचा प्रयत्न अधिक दिसला, परंतु 46-60 वयोगटातील लोकांनी सर्वात कमी संपर्क साधला.सर्वेक्षणानुसार, बीएमसी निवडणुकीत सर्वात महत्त्वाचा घटक नगरसेवकाचे काम असेल. 36-45 वयोगटातील 54% लोकांनी याला सर्वात महत्त्वाचे सांगितले. त्यानंतर मुद्दे आणि विकास येतात. पक्षाचे निवडणूक चिन्ह किंवा मुख्यमंत्री-पंतप्रधानांचा चेहरा बहुसंख्य मतदारांसाठी कमी महत्त्वाचा आहे.नगरसेवकांच्या कामकाजाबद्दल बोलायचे झाल्यास, 46-60 वयोगटातील वर्ग सर्वात समाधानी आहे, तर युवा वर्गात नाराजी जास्त दिसून आली. 18-25 वयोगटातील 13% तरुणांनी आपल्या नगरसेवकावर “खूप असमाधानी” असल्याची माहिती दिली.2024 च्या विधानसभा निवडणुकीत मराठी माणूस (63%) आणि मुस्लिम (57%) मतदारांचा सहभाग जास्त होता. परंतु 2026 च्या बीएमसी निवडणुकीबाबत चित्र स्पष्ट नाही.

महिलांमध्ये 69%, मराठी माणसामध्ये 55%, मुस्लिमांमध्ये 52% आणि इतर वर्गांमध्ये 63% लोकांनी अजून ठरवले नाही की ते कोणाला मतदान करतील किंवा मतदान करतील की नाही. यापूर्वी 2017 च्या बीएमसी निवडणुकीत 45% लोक मतदान करण्यासाठी आले नव्हते.

## 'बिनविरोध'साठी मनसेच्या पदाधिकाऱ्याचा मर्डर- खासदार प्रणिती शिंदे संतापल्या

**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

मुंबई-बृहन्मुंबई महानगरपालिका (BMC) निवडणुकीत मतदारांसाठी नगरसेवकाचा चेहरा, पक्ष, जात-धर्म यापेक्षा त्यांच्या कामाच्या आधारावर मतदान करतील. 40%-54% पर्यंत लोकांनी त्यांच्या मतानुसार नगरसेवकाच्या कामालाच सर्वात महत्त्वाचा घटक सांगितले आहे.विधानसभा निवडणुकीच्या ट्रेंडनुसारच BMC निवडणुकीतही महिलांचा 50% पाठिंबा भाजप-शिवसेना (शिंदे) युतीला मिळू शकतो. तर, मराठी माणसाचा शिवसेना (UBT)-मनसेला 44% आणि भाजप-शिवसेना (शिंदे) युतीला 42%



पाठिंबा दिसत आहे. म्हणजेच मराठी मतही एकतर्फी ठाकरे बंधूंच्या बाजूने नाही.

दुसरीकडे मुस्लिम मतदार INC+ सोबत सर्वाधिक 41% दिसत आहेत. गुजराती, उत्तर आणि दक्षिण भारतीय समुदायात भाजप-शिवसेना (शिंदे) युतीला 53% पाठिंबा मिळू शकतो. तथापि, अजूनही 60 टक्के लोकांनी मतदान करण्याचा निर्णय घेतलेला नाही.

## हिजाब वादावर इम्तियाज जलील म्हणाले: मुस्लिम महिलांना चुकीच्या हेतूने स्पर्श केल्यास हात कापेन!



**दिव्य वतन /वृत्तसंस्था**

छत्रपती संभाजीनगर : हिजाब वादावरून एआयएमआयएम नेते आणि माजी खासदार इम्तियाज जलील यांनी शनिवारी म्हटले की, जर कोणताही व्यक्ती मुस्लिम महिलांना चुकीच्या हेतूने स्पर्श करण्याचा प्रयत्न करेल, तर ते त्याचा हात कापतील.

जलील यांचे हे विधान बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी एका महिलेच्या चेहऱ्यावरून हिजाब काढल्याच्या घटनेनंतर आणि यावर उत्तर प्रदेशचे मंत्री संजय निषाद यांच्या टिप्पणीनंतर समोर आले आहे.

संजय निषाद यांनी म्हटले होते की, नितीश कुमार यांनी फक्त नकाबच तर स्पर्श केला जर दुसरीकडे स्पर्श केला असता तर काय झाले असते? नंतर मंत्र्यांनी स्पष्टीकरण दिले होते की, त्यांचे विधान चुकीच्या पद्धतीने मांडले गेले आहे. जलील यांनी त्यांच्या विधानाचा उल्लेखही केला.

तर, इम्तियाज जलील यांनी सांगितले की, सत्ताधारी आणि विरोधी पक्षांमधील अनेक पक्ष स्वतःला धर्मनिरपेक्ष म्हणतात. हे पक्ष गुंड आणि गुन्हेगारी घटकांना पाठिंबा देतात, पण मुस्लिमांच्या हक्कात उभे राहण्यास कचरतात.


इम्तियाज जलील म्हणाले- शिवसेना-भाजप नेत्यांनी 1 महिना घड्याळ घालू नये

इम्तियाज जलील जालना येथे 15 जानेवारी रोजी होणाऱ्या मनपा निवडणुकीत AIMIM च्या 17 उमेदवारांच्या समर्थनार्थ प्रचार करत आहेत. यावेळी त्यांनी महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री आणि शिवसेना नेते संजय शिरसाट यांच्या विधानावरही टीका केली. शिरसाट यांनी मकर संक्रांतीचा संदर्भ देत AIMIM च्या `पतंग` या निवडणूक चिन्हावर बंदी घालण्याची मागणी केली होती.

जलील यांनी यावर म्हटले की, जर असे असेल तर शिवसेना आणि भाजप नेत्यांनीही पुढील एक महिना `घड्याळ` घालू नये. त्यांचे हे विधान महायुतीच्या सहयोगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (एनसीपी) `घड्याळ` या निवडणूक चिन्हावर केलेला टोमणा मानला जात आहे. कारण एनसीपी स्वतंत्र निवडणूक लढवत आहे.

मुख्यमंत्री नितीश कुमार 15 डिसेंबर (2025) रोजी पटना येथे आयुष डॉक्टरांना नियुक्तीपत्र देत होते. डॉ. नुसरत पत्र घेण्यासाठी मंचावर आल्या. नितीश कुमार त्यांना पत्र देऊ लागले. नितीश कुमार यांनी नुसरतच्या हिजाबकडे बोट दाखवत विचारले की, हे काय आहे जी. नुसरतने उत्तर दिले, हिजाब आहे सर. मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, हे काढा. यानंतर नितीश कुमार यांनी नुसरतचा हिजाब ओढला.

यावेळी उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी नितीश कुमार यांना थांबवण्याचा प्रयत्न करताना दिसले. हिजाब काढल्याने नुसरत थोड्या वेळासाठी अस्वस्थ झाली.



आसपासचे लोक हसू लागले. अधिकाऱ्यांनी नुसरत यांना जॉइनिंग लेटर देऊन जाण्याचा इशारा केला. यानंतर नुसरत तिथून निघून गेल्या.

संजय निषाद म्हणाले होते- दुसरीकडेही स्पर्श करतात का?

यानंतर यूपीचे मंत्री संजय निषाद यांनी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांचा बचाव केला होता. संजय निषाद म्हणाले होते- अरे तेही माणूसच आहेत ना... नकाबाला स्पर्श केला, तर इतके मागे लागू नये.

दुसरीकडे स्पर्श केला असता तर काय झाले असते? तुम्हाला काय वाटते, दुसरीकडेही स्पर्श करतात का? नाही... नकाबावर तुम्ही लोक इतके बोलत आहात. कुठे चेहरा-बिहेरा स्पर्श केला असता...कुठे दुसरीकडे बोट लागले असते तर तुम्ही लोक काय केले असते?

मंत्री निषाद एका चॅनलला मुलाखत देत होते. त्यांच्या विधानावर सोशल मीडियावर लोकांनी आक्षेप घेतला. नंतर मंत्री निषाद यांनी व्हिडिओ जारी करून माफी मागितली होती.